नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३१८ * * वाशीम * | गुरुवार, दिनांक १५ मे २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शोपियानमध्ये शस्त्रास्त्रांचा साठा जप्त

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १४ :**
भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतरही सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरूच आहे. जम्मू आणि काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील केलरमध्ये बुधवारी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. यामध्ये एके-47 बंदूक, हँडग्रेनेड, हजारो गोळ्यांसह प्रकारच्या बंदुका समाविष्ट आहेत.

१३ मे रोजी केलरमध्ये सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबा (एलईटी) चे तीन दहशतवादी मारले गेले. शोपियान जिल्ह्यात मंगळवारी दुपारी ४.३० वाजता ही चकमक संपली. त्याला ऑपरेशन केलर असे नाव देण्यात आले. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये लष्कर-ए-तैयबाचा टॉप कमांडर शाहिद अहमद कुट्टीचाही समावेश होता.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## नक्षलवाद्यांची इतिश्री

आज पुन्हा भारताच्या सुरक्षा दलांनी 31 हून अधिक नक्षलवाद्यांना ठार केले. या वर्षात नक्षलवाद्यांची समाप्ती करण्याचा सरकारचा इरादा आहे. पश्चिम बंगालमधील नक्षल नावाच्या गावापासून 1976 सालामध्ये सुरू झालेली ही चळवळ आता शेवटची वळवळ करीत आहे. याच नक्षलवाद्यांचा सध्याचा म्होरक्या वेणुगोपाल याने काही दिवसांपूर्वी आम्ही शांत राहतो. तुम्हीही शांत रहा अशी सूचनावजा मागणी सरकारकडे केलेली होती. मात्र सरकारने आणि मुख्य म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही चळवळ मुळापासून संपवण्याचा निर्धार केलेला आहे. सैतानाच्या तोंडून कधीच प्रेमाची भाषा निघत नसते. पण जेव्हा सैतानाच्या गळ्याजवळ तलवारीचे पाते जाते. तेव्हा त्यांना जीवाची किंमत कळते. पाकिस्तानातील दहशतवाद्यांचा नेता असलेल्या या नक्षलवाद्यांच्या सारख्याच अझर मसूद याचे दहा कुटुंबीय जेव्हा ठार झाले. तेव्हा त्याला माणसांच्या जीवाची किंमत कळली. जेव्हा आपली माणसे मरतात. तेव्हा त्यांच्या प्राणांचे मोल कळते. त्यावेळी तोच अझर मसूद ढसाढसा रडला. त्याने कित्येक निरपराध्यांना कारण नसताना ठार मारले. तेव्हा किती निरपराध मेले याची गणती त्याने सुद्धा केली नसेल. तद्वतच आता उरल्या सुरल्या नक्षलवाद्यांनी शांततादूत होण्याचा उपक्रम करून पाहिला आहे. जीवाच्या भीतीने शिव-शिव करून त्यांनी शांततेसाठी ही चिव-चिव केलेली आहे. पण अजूनही आम्ही बहादूर आहोत. असा उसना आव त्यांनी आणला आहे. आम्ही उदार मनाने शांततेसाठी विनंती केली. असे त्यांचे म्हणणे आहे. पण सरकारने त्यांना जराही प्रतिसाद दिलेला नाही. त्या उलट शांतता-बिंतता काही नाही. सरळ सरळ सरकारला शरण या. असे सरकारने त्यांना ठणकावले. पण ज्या नक्षलवाद्यांनी क्रुरतेला वरण केले आहे. अनेकांना मरण दिले आहे. त्यांचे चरण शांतीच्या मार्गावर कसे पडतील. हा विचार करण्यासारखा विषय आहे आणि ही गोष्ट आपल्या सरकारलाही पक्की ठाऊक आहे. तसेही नक्षलवाद्यांची 90 टक्के ठिकाणे आपल्या सुरक्षा दलांनी जवळजवळ नष्ट केलेली आहेत. पण म्हणतात ना, दिवा जळल्यावर विझण्यापूर्वी शेवटी जास्त फडफडत असतो. म्हणजेच जरा जास्त प्रकाश देत असतो. तशीच फडफड आता नक्षलवाद्यांकडून सुरू झालेली आहे?. या देशातील अनेक पोलीस अधिकारी, तसेच सुरक्षा बलाचे सैनिक, कित्येक साधे पोलीस त्या सोबतच कित्येक पुढाऱ्यांना आणि त्या ठिकाणच्या अनेक पंचांना, सरपंचांना आणि उपसरपंचांना छाती ताठ करून मारणारे नक्षलवादी आता अंतिम घटका मोजत आहेत. हे आता सुस्पष्टपणे दिसून येत आहे. ज्या ठिकाणी हे नक्षलवादी नामक प्राणी जमलेले आहेत. त्यांना आणि त्या ठिकाणांना सुरक्षा यंत्रणांनी चारही बाजूंनी वेढा घातलेला आहे. पण या नक्षलवाद्यांची अक्कल काही अजून ठिकाणावर आलेली दिसत नाही. त्यांनी किती जनतेचे हित साधन केले. याची गोळाबेरीज केल्यावर समोर काय दिसते. आपल्या गडचिरोली जिल्ह्यातील उदाहरण घेतले. तर बड्याबड्या कंपन्यांकडून मोठमोठ्या रकमेची खंडणी वसूल करणे आणि जंगलात राहून त्या खंडणीचा उपभोग घेणे. हे आणि इतकेच त्यांचे काम होते. आता पाकिस्तानचे आतंकवादी आणि भारतातील नक्षलवादी या दोघांनाही लक्ष्य करून त्यांचे भक्षण करण्यासाठी आपली सुरक्षा दले सज्ज झालेली आहेत. आपल्या देशातील या गुन्हेगारांनी त्यांच्या राक्षसीपणातून बाहेर येऊन माणसासारखे वागले पाहिजे. यासाठी सरकारने त्यांना अनेकदा संधी दिली होती. तेव्हा या मंडळींनी सरकारला वाकुल्या दाखवल्या होत्या. मात्र आता सर्व काही त्यांच्याच उरावर बसल्यावर आता तेच शांतता राखण्याचा खोटा आव आणत आहेत. पण जर सरकारने मनात आणले तर सरकार काय करू शकते. हे आता त्यांना दिसून आलेले आहे. त्यामुळेच त्यांचीच पॅन्ट फाटली आहे. सरकारला हे गाजरगवत जाळून टाकण्यात यश मिळेल. याबद्दल आमच्या मनात जराही संशय नाही. या मोहिमेचे अध्वर्यू आणि आपल्या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना निश्चितच याबद्दल धन्यवाद दिलेच पाहिजेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मराठमोळे भूषण गवई नवे सरन्यायाधीश



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :**
न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी आज भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांना सरन्यायाधीशपदाची शपथ दिली. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपला. सरन्यायाधीश खन्ना यांच्यानंतर न्यायमूर्ती गवई यांचे नाव ज्येष्ठता यादीत होते. म्हणूनच न्यायमूर्ती खन्ना यांनी त्यांचे नाव पुढे केले. त्यांचा कार्यकाळ फक्त ७ महिन्यांचा आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवरील त्यांच्या प्रोफाइलनुसार, न्यायमूर्ती गवई यांना २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली. त्यांची निवृत्ती तारीख २३ नोव्हेंबर २०२५ आहे.

न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून आज शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे त्यांना बुधवारी शपथ दिली. माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना हे १३ मे रोजी निवृत्त झाले. भूषण गवई हे आता २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहणार आहेत.

२००७ साली सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणारे न्या. के.जी. बालाकृष्णन यांच्यानंतर न्या. गवई हे दुसरे दलित व्यक्ती ठरणार आहेत. त्यांच्या शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते.

सुमारे दहा मिनिटे हा शपथविधी सोहळा चालला. यावेळी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, निवृत्त सरन्यायाधीश संजीव खन्ना, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाश सिंह, विधी मंत्री अर्जुन राम मेघवाल, उद्योग मंत्री पीयुष गोयल, रसायन विभागाचे मंत्री जेपी नड्डा यांच्यासह सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



राष्ट्रपती बाहेर प्रस्थान करत असतानाच पीएम मोदी थेट गवई यांच्या कुटुंबीयांकडे वळले. न्या.गवई यांच्या मातोश्री कमलाताई गवई यांच्याकडे मोदी गेले आणि त्यांचा हात पकडून त्यांना अभिवादन केले आणि आपुलकीने संवाद साधला. मोदी यांनी कमलाताई गवई यांच्या तब्येतीची विचारपूस देखील केली. दरम्यान, न्या. गवई यांचे बंधू राजेंद्र गवई यांनी समोर येऊन मोदी यांच्यासोबत हस्तांदोलन केले.

सरन्यायाधीशपदाची शपथ घेताच १५ मे रोजी त्यांच्यासमोर वक्फ कायद्याचे प्रकरण सुनावणीसाठी येईल. शपथविधी सोहळ्याची सांगता राष्ट्रगीताने झाली. लगेचच राष्ट्रपती मूर्मू आणि त्यांच्या पाठोपाठ उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रस्थान करायला सुरूवात केली.

न्या. गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावतीमध्ये झाला. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई आंबेडकरी चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी होते. त्यांना दादासाहेब म्हणून ओळखले जायचे. त्यांनी अमरावतीचे खासदारपद व पुढे बिहार, सिक्किम आणि केरळचे राज्यपालपद भूषवले. गवई राजकीय कुटुंबातून आले असले तरी न्याय क्षेत्रात त्यांनी कधीही याचा परिणाम होऊ दिला नाही. न्या. गवई यांना सरन्यायाधीश म्हणून अगदी सहा महिन्यांचा कार्यकाळ मिळणार आहे.

भूषण गवई यांनी नागपूर विद्यापीठातून बी.ए. आणि एल.एल.बी. पदवी प्राप्त केली.

१६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीची नोंदणी केली आणि बारिस्टर राजा एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. १९८७ ते १९९० या काळात मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली.

## तुर्किच्या इनोनू विद्यापीठासोबतचा जेएनयुने करार मोडला

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**
भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने (जेएनयु) तुर्कीच्या इनोनू विद्यापीठासोबतचा सामंजस्य करार रद्द केला आहे. जेएनयूने एक्स वर लिहिले, आम्ही देशासोबत उभे आहोत.

त्याच वेळी, भारताने चीनच्या सरकारी माध्यम ग्लोबल टाईम्स, शिन्हुआ आणि तुर्कीच्या सरकारी माध्यम टीआरटी वर्ल्डच्या एक्स अकाउंटवरील बंदी उठवली. दोन्ही खाती फक्त ५ तासांसाठी ब्लॉक करण्यात आली. त्यांच्यावर भारतविरोधी प्रचार चालवण्याचा आणि सैन्याबद्दल खोट्या बातम्या पसरवण्याचा आरोप होता.

दरम्यान, भारतीय व्यापाऱ्यांनी तुर्कीमधून सफरचंद आयात करण्यास नकार दिला आहे. व्यापारी म्हणतात की तुर्की पाकिस्तानला ड्रोन पुरवतो. पाकिस्तानने या ड्रोनने भारतावर हल्ला केला. आता आम्ही तुर्की सफरचंद विकणार नाही. भारत तुर्कीमधून दरवर्षी १२०० कोटी रुपयांच्या वस्तू आयात करतो. त्यात मोठ्या प्रमाणात सफरचंद असतात.

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धविरामानंतरही सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरूच आहे. जम्मू आणि काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील केलरमध्ये बुधवारी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. युद्धविरामानंतर, बुधवारी सकाळी जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर येथील हज हाऊस येथून हज यात्रेकरूंचा दुसरा जथ्था विमानतळाकडे रवाना झाला.

## अपहृत बीएसएफ जवानाची पाकिस्तानकडून सुटका

■ **वृत्तसंस्था, अमृतसर, दि. १४ :**
भारताचा बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉ यांची पाकिस्तानने सुटका केली आहे. कॉन्स्टेबल पूर्णम बुधवारी सकाळी १०:३० वाजता अटारी-वाघा सीमेवरून भारतात परतले. डीजीएमओ स्तरावर झालेल्या चर्चेनंतर २० दिवसांनी त्यांना सोडण्यात आले. त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले आहे. चौकशीनंतर त्यांना घरी जाण्याची परवानगी दिली जाईल.



बीएसएफने एका प्रेस विज्ञप्तीद्वारे कॉन्स्टेबल पूर्णम भारतात परतल्याची माहिती दिली आहे. त्यात म्हटले आहे की पूर्णम शॉ २३ एप्रिल रोजी फिरोजपूर सेक्टरमध्ये ऑपरेशनल ड्युटीवर असताना चुकून पाकिस्तानला गेले होते. यानंतर त्यांना पाकिस्तान रेंजर्सनी ताब्यात घेतले.

पहलगाम दहशतवादी हल्लूयाच्या दुसऱ्या दिवशी, पाकिस्तानी रेंजर्सनी बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉ यांचे दोन फोटो प्रसिद्ध केले होते. आता त्यांची सुटका झाली आहे.

## 'झुकेगा नही..' हे दाखवून दिले!

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :**
भारतीय सेनेचे आभार मानण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून मुंबईत आज भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर या रॅलीचा समारोप झाला.



या समारोप सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेते आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगलप्रभात लोढा, प्रवीण दरेकर, अतुल भातखळकर, चित्रा वाघ यांच्यासह भाजपचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ठिकाणी झालेल्या सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारतीय सेनेच्या पराक्रमाचे जाहीर कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ऑपरेश सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सेनेने दाखवून दिले, हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे, न बिकेंगे, न थकेंगे अशा प्रकारे भारतीय सेनेची ताकद काय आहे? ही ताकद आपल्याला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाहायला मिळाली.

मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर हे लॉन्च केले. आमच्या भगिनींचे कुंकू पुसण्याचे काम ज्या दहशतवाद्यांनी आणि ज्या देशाने केले होते, त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरची सुरुवात झाली. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त करून टाकले, असे फडणवीस म्हणाले.

मला सर्वात जास्त आनंद कशाचा असेल, तर ज्या ठिकाणी हरामखोर कसाबने प्रशिक्षण घेतले. तो अड्डा देखील नेस्तनाबूत करण्याचे काम केले. इतकेच नाही, तर आपल्या मुंबईचे अपराधी असलेले मकसूद अजहर, अबू जिंदल त्यांनाही ठोकण्याचे काम आपल्या सैन्याने केले. भारतीय सैन्याने दाखवून दिले की, तुम कहीं पर छुपोगे, हम घुसकर मारेंगे, हम तुमको छोडने वाले नहीं है, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा एकही हल्ला यशस्वी होऊ शकला नाही, याचा मला अभिमान आहे. त्यांनी मोठ्याप्रमाणात मिसाइलचा वापर केला, पण त्यांचे सगळे मिसाइल भारतीय सेनेने हवेतच उडवून दिले. त्यांनी ड्रोनचा वापर करायचा प्रयत्न केला, तरीही त्यांचा एकही ड्रोनचा हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. भारताने हे दाखवून दिले की, आमची डिफेन्स सिस्टिम इतकी मजबूत आहे की, त्याच्यामध्ये घुसण्याची ताकद पाकिस्तानची नाही, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## युद्धबंदीत अमेरिकेची भूमिका काय?

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :** काँग्रेसचा प्रश्न



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा का केली? पंतप्रधान मोदी यावर काहीही बोलत नाहीत, असे काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस पक्ष विचारत आहे की अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो म्हणतात की अमेरिकेची भूमिका इतकी महत्त्वाची होती की त्यांच्यामुळेच हे युद्ध थांबले. परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकरही याचे उत्तर देत नाहीत. आम्ही सतत विचारत आहोत की पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री अमेरिकेची भूमिका काय आहे याचे उत्तर का देत नाहीत? असा सवाल त्यांनी केला.

जयराम रमेश म्हणाले, काश्मीरवर फक्त भारतीय संसदेतच चर्चा होऊ शकते. यामध्ये मध्यस्थी करण्याचा अधिकार कोणालाही नाही. आम्ही आमच्या सैन्यासोबत पर्वतासारखे उभे आहोत. दहशतवादाविरुद्ध आणि पाकिस्तानविरुद्ध केल्या जाणाऱ्या कारवाईला आम्ही पूर्ण पाठिंबा देत आहोत.

आम्ही सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणीही केली आहे. दोन सर्वपक्षीय बैठका झाल्या, परंतु दोन्ही बैठकींमध्ये पंतप्रधान मोदी उपस्थित नव्हते... काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम दहशतवादी हल्लूयावर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले आहे. युद्धबंदीत अमेरिकेची नेमकी भूमिका काय? याचा खुलासा व्हावा, असेही जयराम रमेश म्हणाले.

## तिघांत स्पीड ब्रेकरला जागा नाही



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
आता मी तिघे एकत्रित आहोत. आम्ही तिघांनी सुसाट वेगाने आमची विकासाची एक्सप्रेस सुरू केलेली आहे. आता त्यामध्ये कोणीही स्पीडब्रेकर आणू शकत नाही. कोणाला बुस्टर द्यायचा असेल तर वेगळी गोष्ट आहे. मात्र स्पीड ब्रेकरला आता आमच्यात जागा नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. महामुंबई मेट्रो ९ चा चाचणी टप्पा आज पूर्ण झाला. या वेळी ते माध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील आता आमच्या तिघांची मेट्रो बुलेटच्या स्पीडने काम करणार असल्याचा दावा केला आहे. आता तर आम्ही तिघे एकत्र आहोत. त्यामुळे बुलेट ट्रेनच्या स्पीडने आम्ही सर्व कामे करणार असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोणीही मनात शंका बाळगून नये. आमचा आता डेव्हलपमेंट हा एकच अजेंडा असल्याचे देखील एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी मेट्रो मार्ग-९ वर दहिसर (पूर्व) ते काशीगाव या मेट्रोची तांत्रिक तपासणी केली. फडणवीस म्हणाले की, महामुंबई मेट्रो ९ चा चाचणी टप्पा आज पूर्ण होत आहे. या मेट्रो ९ चा मीरा भाईंदर आणि मुंबईहून येणाऱ्यांना खूप फायदा होईल. हा टप्पा काशीगाव ते दहिसर पर्यंत आहे. एमएमआर प्रदेशात पहिल्यांदाच दुहेरी चेंबर पूल देखील बांधण्यात आला आहे. मेट्रो आणि रेल्वे पूल एकाच रचनेत दिसतील. यामुळे मोठी वाहतूक कोंडी कमी होईल.

## राज्याच्या अनेक भागात अवकाळीचा कहर

### केळी, टरबूज बागा जमीनदोस्त

■ **वृत्तसंस्था
धाराशिव, दि. १४ :**
राज्यातील अनेक भागांत मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्ग चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. या पावसाने शेती पिकांना आणि फळबागांना मोठा फटका दिला असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.



बीड, नंदुरबार आणि धाराशिव जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या तडाख्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. बीडमध्ये मागील आठ दिवसांत वीस कोसळून तिघांचा मृत्यू झाला.

बीड जिल्ह्याला मागील आठ दिवसांपासून एकूण २४ गावांना अवकाळीचा तडाखा बसला आहे. ५ ते १३ मे या कालावधीत सुमारे १८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. जिल्ह्यात वीज कोसळून तीन जणांना मृत्यू, तर एक जण जखमी झाला असून १६ जनावरे देखील दगावली आहेत. तर एकूण ५ घरांची पडझड झाली. महसूल प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची अपेक्षा आहे.

धाराशिव जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे केळी उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. अचानक येत असलेल्या वादळी वारा आणि पावसामुळे केळी पिकाला मोठा फटका बसत आहे.

वारा आणि पावसामुळे केळीची पाने फाटत असल्याने त्याचा परिणाम थेट उत्पन्नावर होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली असून खर्च तरी निघणार का? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## मंत्र्याविरोधात एफआयआर करा...

### कोर्टाचे आदेश



■ **वृत्तसंस्था
भोपाळ, दि. १४ :**
कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावरील वादग्रस्त विधान प्रकरणी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने बुधवारी आदिवासी व्यवहार मंत्री विजय शाह यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले. जबलपूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतुल श्रीधरन यांनी स्वतः या प्रकरणाची दखल घेतली.

न्यायालयाने डीजीपींना ४ तासांच्या आत एफआयआर नोंदवून कारवाई करण्यास सांगितले. मंत्र्यांच्या विधानाबाबत ग्रामीण डीआयजी निमिश अग्रवाल म्हणतात की आम्हाला अद्याप कोणतेही आदेश मिळालेले नाहीत. आदेश येताच गुन्हा दाखल केला जाईल. भारताची एकता आणि अखंडता धोक्यात आणल्याबद्दल गुन्हा नोंदवा. जर एफआयआर नोंदवला गेला नाही तर डीजीपींविरुद्ध न्यायालयाचा अवमान केल्याची कारवाई सुरू केली जाईल. मंत्री विजय शहा यांचे विधान जातीयवादाला प्रोत्साहन देत असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

रविवारी मंत्री इंदूरमधील महू येथील रायकुंडा गावात एका कार्यक्रमात सहभागी झाले होते. इथेच वादग्रस्त विधान देण्यात आले. तथापि, मंगळवारी हा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांना दहशतवाद्यांची बहीण म्हटले होते.

## अजित पवार- एकनाथ शिंदेंनी अमित शहांच्या मदतीने पक्ष पळवला



■ **मुंबई:** राज ठाकरे आणि नारायण राणे यांनी पक्ष सोडला तेव्हा पक्षावर दावा केला नाही. या दोन्ही नेत्यांनी पक्ष सोडल्यानंतर स्वतःचा पक्ष स्थापन केला. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी मात्र, पक्ष पळवला असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

अजित पवार हे अमित शहा यांच्या मदतीने शरद पवार यांचा पक्ष पळवून घेऊन गेले आहेत. मी या बाबतीत नेहमीच दोन नेत्यांचे कौतुक करतो. त्यातील एक नारायण राणे यांनी पक्ष सोडला आणि त्यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केला. त्यांना पक्ष चालवायला जमला नाही, त्यामुळे ते दुसऱ्या पक्षात गेले. दुसरे राज ठाकरे यांनी देखील स्वतःचा पक्ष स्थापन केला. त्यांचे आणि आमचे मतभेद झाले मात्र, त्यांनी स्वतःचा पक्ष काढून राजकारण केले. एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणे त्यांनी शिवसेना माझीच आहे, असे कधी सांगितले नाही. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यात आणि नारायण राणे आणि राज ठाकरे यांच्यात हा फरक असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## शासकीय विश्रामगृहात सामूहिक बलात्कार आव्हाड यांच्या पोस्टने खळबळ



■ **मुंबई:** ६ तारखेला दाखल झालेल्या एका सामूहिक बलात्काराप्रकरणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. वरिष्ठाच्या दबावातून पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे. शासकीय विश्रामगृहात हा प्रकार झाल्याचे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. यावर सीसीटीव्ही तपासल्या शिवाय गुन्हा नोंदवणे म्हणजे आयुष्य उद्धवस्त करणे असे सांगतानाच जर एखाद्याने आत्महत्येचा निर्णय घेतला तर जबाबदारी कोण घेणार असा सवाल आव्हाडांनी उपस्थित केला आहे.

जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र यंत्रणा नेमायला हवी. हे प्रकरण केवळ राजकीय वैमनस्यातून उभे केले गेले आहे असा आरोप आव्हाड यांनी केला आहे. या गुन्ह्यातील गंभीर बाब म्हणजे, शासकीय विश्रामगृहात सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही पोलिसांनी संबंधित फुटेज न तपासता थेट गुन्हा नोंदविल्याचा आरोप आव्हाडांनी केला आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले आहे की, प्रत्येक शासकीय विश्रामगृहात शासनाच्या आदेशाने सीसीटीव्ही बसवले आहेत. पण त्याचे फुटेज न तपासता गुन्हा नोंदवून काहींच्या आयुष्यावर गदा आणली जात आहे. पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवण्यास नकार दिला होता, परंतु वरून आलेल्या दबावामुळे अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. हे प्रकरण केवळ राजकीय वैमनस्यातून उभे केले गेले असून, गोरगरीब व्यक्तींचे चारित्र्यहनन करून त्यांचे आयुष्य उद्धवस्त करण्याचे काम सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली.

## मतदार ओळखपत्र क्रमांकांचा गोंधळ सुटला

■ **मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने (एउक) सुमारे २० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एकसारख्या मतदार ओळखपत्र (एढक्ळ) क्रमांकांच्या समस्येचे यशस्वी निराकरण केले आहे. निवडणूक यादी निर्दोष आणि अद्ययावत ठेवण्याच्या प्रयत्नांतर्गत, २००५ पासून वेगवेगळ्या निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांनी वापरलेल्या एकसारख्या मालिकांमुळे निर्माण झालेला गोंधळ आता दूर झाला आहे. यामुळे काही खरे मतदार एकसारख्या एढक्ळ क्रमांकांसह नोंदवले गेले होते.

या समस्येचे समाधान करण्यासाठी ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुख्य निवडणूक अधिकारी आणि ४,१२३ विधानसभा मतदारसंघांतील १०.५० लाख मतदान केंद्रांवरील ९९ कोटींहून अधिक मतदारांच्या निवडणूक माहितीची पडताळणी केली. सरासरी प्रत्येक ४ मतदान केंद्रांमागे फक्त १ असा एढक्ळ क्रमांक आढळला. क्षेत्रीय तपासणीत सर्व मतदार खरे असून, ते वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघ आणि मतदान केंद्रांचे रहिवासी असल्याचे स्पष्ट झाले. या सर्व मतदारांना नवीन क्रमांकांसह नवीन एढक्ळ कार्डे वितरित करण्यात आली आहेत. आयोगाने स्पष्ट केले की, ही समस्या २००५ पासून होती, जेव्हा वेगवेगळ्या राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी स्वतंत्रपणे एढक्ळ क्रमांकांच्या मालिका वापरल्या. २००८ मधील मतदारसंघ पुनर्रचनेनंतर मालिका बदलल्या, परंतु काही ठिकाणी जुन्या मालिका किंवा टंकलेखन चुकांमुळे दुसऱ्या मतदारसंघाच्या मालिका वापरल्या गेल्या. तरीही, प्रत्येक मतदाराचे नाव त्याच्या मतदान केंद्राच्या यादीत असते, त्यामुळे एकसारख्या एढक्ळ क्रमांकाचा वापर करून कोणीही दुसऱ्या केंद्रावर मतदान करू शकले नाही. परिणामी, या गोंधळाचा कोणत्याही निवडणूक निकालावर परिणाम झाला नाही, असे आयोगाने नमूद केले.

## पुण्यात १० कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

■ **पुणे :** डायरेक्टरेट ऑफ कस्टम डिपार्टमेंट (डीआरआय) च्या पुणे, मुंबई शाखेतील अधिकाऱ्यांना बँकाकवरुन पुणे विमानतळावर येणाऱ्या विमानातील दोन प्रवाशांकडे संशयित सामान असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, बँकाकहून पुण्यात आलेल्या विमानातील प्रवाशांच्या सामानाची सखोल तपासणी केली असता, दोन प्रवाशांचे सामानात ११ हवाबंद पाऊच मिळून आले. त्याची तपासणी केली असता ते १०.३० कोटी रुपये किंमतीचे बाजारमूल्य असलेले हायड्रोपोनिक गेंड हा गांजा सारखा अंमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले आहे.

याप्रकरणी डीआरआयने दोन प्रवासी तसेच मुंबईतील एक वितरक अशा एकूण तीनजणांना अटक केली आहे. सदर माल घेणाऱ्या मुंबईतील एका वितरकाला देखील तपासात याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्याच्या झडतीत अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

# बाबासाहेबांच्या वारसांच्या जमिनीवर भूमाफियांचा डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**

डोंबिवली येथील भूमाफियांनी चक्क भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या नावावर असणारा भूखंडच हडपल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे.

अतिक्रमण करणाऱ्यांनी या ठिकाणी ८ मजली टोलेजंग इमारत बांधली. हे प्रकरण चव्हाट्यावर आल्यानंतर यासंबंधी प्रशासकीय दुर्लक्षाची बाब समोर आली. त्यानंतर आता डोंबिवली पालिकेने हे अवैध बांधकाम पाडण्याची तयारी सुरू केली आहे.

डोंबिवली लगतच्या दावडी येथे व्यंकटेश पेट्रोल पंपाच्या मागील सेंट जॉन शाळेसमोरील जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करून एक ८ मजली इमारत बांधली आहे. मुळात ही जमीन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या नावे आहे. या जमिनीच्या सातबाराच्या उताऱ्यावर वारस म्हणून बाबासाहेबांचे नातू प्रकाश आंबेडकर, आनंदराज आंबेडकर, भिमराव आंबेडकर, रमाताई तेलतुंबडे यांची नावेही आहेत. पण त्यानंतरही भूमाफियांनी या जमिनीवक कब्जा

### बेकायदा उभारली ८ मजली टोलेजंग इमारत : पालिका करणार कारवाई



करून ती ताब्यात घेतली.

आपल्या भूखंडावर अतिक्रमण होत असल्याचे लक्षात येताच आनंदराज आंबेडकर यांनी संबधित भूमाफियाला जाब विचारला. रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी आनंद नवसागरे यांनी याप्रकरणी पालिका प्रशासनाकडे तक्रार करत हे अनधिकृत बांधकाम तोडण्याची मागणी केली.

मागील अडीच वर्षांपासून नवसागरे या प्रकरणाचा पाठपुरावा केला. मधल्या काळात एका विकासाने या इमारतीचे काम अर्धवट सोडले. त्यानंतर भूमाफियाने दुसऱ्या एका विकासकाच्या मदतीने अर्धवट इमारतीचे काम पूर्ण केले.

विशेष म्हणजे २०२३ मध्ये या इमारतीचे तळ अधिक एक मजल्याचे बांधकाम झाल्यानंतर याविषयी डोंबिवली पालिका प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली. त्यावर पालिकेने नोटीस बजावण्याशिवाय दुसरी कोणतीही कारवाई केली नाही.

पण आता जनक्षोभ उसळल्यानंतर पालिका प्रशासनाने या प्रकरणी विकासकावर एमआरटीपी अंतर्गत मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच वादग्रस्त इमारत २० मे रोजी पाडण्याची कारवाई केली जाणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

पालिकेने या कामासाठी पोलिसांकडे बंदोबस्ताची मागणी केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे कल्याण डोंबिवली येथील बेकायदा बांधकामांचा प्रश्न अत्यंत क्लिष्ट बनला आहे. भूमाफियांनी पालिकेचे बनावट दस्तऐवज बनवून रेरा घोटाळा केल्याची बाब समोर आली आहे.

रेरा घोटाळ्यातील ६५ बेकायदा बांधकामाविरोधात वास्तुविशारद संदीप पाटील यांनी एक जनहित याचिका दाखल केली होती. त्यानंतर कोर्टाने सदर अवैध बांधकाम पाडण्याचे आदेश दिलेत.

दरम्यान, भूमाफियांनी शहरातील मोकळ्या जागांवर कब्जा तर केला आहेच, शिवाय पालिकेच्या आरक्षित जमिनींवरही टोलेजंग इमारती बांधल्याचे उजेडात आले आहे.

## निवडणुकीआधी वाढल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अडचणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला मोठा राजकीय अडचणी निर्माण झाल्या आहेत. पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी अचानक आपल्या पदाचा राजीनामा देऊन पक्षात खळबळ उडवून दिली आहे. या राजीनाम्याने अजित पवार यांच्या नेतृत्वाला गंभीर फटका बसला असून, निवडणुकीपूर्वी पक्षाची रणनीती आणि एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मानकर यांनी राजीनामा पत्रात पक्ष सोडण्यामागील कारणे स्पष्ट केली आहेत. त्यांनी म्हटले आहे की, काही वर्षांपूर्वी केलेल्या जमीन व्यवहारात आता अचानक ३-४ दिवसांपूर्वी शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा माझ्यावर दाखल झाला आहे. हा गुन्हा अद्याप सिद्ध झालेला नाही.

मात्र, महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर माझी राजकीय कारकीर्द मलिन करण्याचा हा सुनियोजित प्रयत्न आहे. या व्यवहारात माझ्याकडून कोणताही गैरप्रकार झालेला नाही.

त्यांनी पुढे नमूद केले की, या प्रकरणामुळे पक्षाची आणि नेतृत्वाची नाहक बदनामी होत आहे. ₹पक्षश्रेष्ठींना यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मी शहराध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे,₹ असे त्यांनी पत्रात लिहिले आहे.

मानकर यांनी आपल्या पत्रात अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केल्याचा दावा केला आहे. ₹पुण्यात पक्षाच्या विस्तारासाठी मी माझ्या परीने पूर्ण प्रयत्न केले. तरीही, सध्याच्या परिस्थितीत पक्षहितासाठी मी हे पाऊल उचलत आहे,₹ असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी आपला राजीनामा पक्षश्रेष्ठींनी मंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

मानकर यांच्या या अनपेक्षित राजीनाम्यामुळे पुणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. शहराध्यक्षपद ही पक्षाची पुण्यातील सर्वात महत्त्वाची जबाबदारी मानली जाते. त्यांच्या राजीनाम्याने पक्षाची निवडणूक तयारी आणि कार्यकर्त्यांचे मनोबल यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः जमीन व्यवहारातील कथित घोटाळ्याचा गुन्हा आणि त्यानंतरचा राजीनामा यामुळे पक्षाच्या प्रतिमेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## जे.जे. सुपरस्पेशालिटी रुग्णालयाला गती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

मुंबईतील जे.जे. रुग्णालयाच्या सुपरस्पेशालिटी इमारतीचे काम तातडीने आणि गतीने पूर्ण करण्याचे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. या प्रकल्पामुळे रुग्णांना कार्डिओलॉजी, न्यूरोसर्जरी, जनरल सर्जरी यासारख्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून, विशेषतः गरजू रुग्णांना याचा मोठा लाभ होईल. ऑक्टोबर २०२५ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मिसाळ यांनी जे.जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला भेट देऊन सविस्तर पाहणी केली आणि आढावा बैठक घेतली. यावेळी त्या म्हणाल्या, सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीला गती द्यावी. यामुळे रुग्णांना सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली मिळतील आणि त्यांचे जीवनमान सुधारेल. बैठकीला सचिव धीरज कुमार, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार, अधीक्षक डॉ. संजय सुरासे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. मिसाळ यांनी रुग्णालयातील कार्डिओलॉजी, न्यूरोसर्जरी, जनरल सर्जरी, अतिदक्षता विभाग (क्ळव) आणि नर्सिंग होम यांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी रुग्णांसाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक उपकरणांची माहिती घेतली आणि त्यांच्या कार्यक्षमतेची खात्री केली. तसेच, रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, रिक्त पदांची भरती, डॉक्टरांसाठी वसतिगृह सुविधा, अन्न गुणवत्ता, स्कॅनिंग सुविधा, ऑपरेशन थिएटर आणि शस्त्रक्रियेसाठी आवश्यक साहित्याच्या उपलब्धतेबाबत सविस्तर चर्चा केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या सर्व बाबींची त्वरित अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

मिसाळ यांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजांकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. बदलत्या काळानुसार वैद्यकीय शिक्षणातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा आणि उत्तम प्रशिक्षण मिळाले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. यासाठी रुग्णालयात आवश्यक सुधारणा आणि पायाभूत सुविधा वाढवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

१८० वर्षांची समृद्ध परंपरा असलेले जे.जे. रुग्णालय प्रतिष्ठित वैद्यकीय संस्थान आहे. या रुग्णालयाला बेस्ट इंटरनॅशनल व्हिडिओ अब्स्ट्रॅक्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## बार्टी प्रशिक्षणार्थ्यांना मुंबई बँकेकडून बिनव्याजी कर्जाची संधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) मधून प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबई जिल्हा बँक ५ लाखापर्यंत बिनव्याजी शैक्षणिक कर्ज देणार असल्याची घोषणा बँकेचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांनी केली. फोर्ट येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात आयोजित भव्य कार्यशाळेत बार्टीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जाबाबत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आयआयटी आणि एनआयटीसारख्या नामांकित संस्थांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कर्ज सुविधा देण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आ. दरेकर म्हणाले, मुंबई बँक नेहमीच शिक्षण आणि शैक्षणिक कर्जासाठी आग्रही आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिक्षणाच्या शक्तीवर विश्वास ठेवून समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे आणि समाजाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे, अशी आमची अपेक्षा आहे. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव आपल्यावर असल्याचे सांगितले.

## शरद पवार भाकरी फिरवण्याच्या तयारीत पक्षाच्या ५ प्रमुख पदाधिकाऱ्यांना डच्चू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसापासून हा पक्ष अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत संलग्न होणार असल्याची शक्यता देखील वर्तवली जात होती. यामुळे शरद पवार लवकरच भाकरी फिरवणार असल्याची चर्चा सुरू झाल्याने याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. त्यात आता पक्षातील महत्त्वाचे पदाधिकारी बदलले जाणार आहेत. त्यामध्ये आमदार रोहित पवार यांच्या मर्जीतल्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील सर्व सेलच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना बदलण्यात येणार असल्याची माहिती आहे. आज झालेल्या पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत देखील या विषयावर चर्चा झाली. युवक अध्यक्ष मेहबूब शेख यांच्याकडून हे पद काढून नवीन युवकाला संधी दिली जाण्याची शक्यता आहे. विद्यार्थी



अध्यक्ष सुनील गावडे यांची उचलबांगडी होऊन त्यांच्या जागेवर नवीन विद्यार्थी अध्यक्ष पक्षाला मिळण्याची शक्यता आहे.

विद्यार्थीनी प्रदेशाध्यक्ष पद तसेच अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष पद सध्या खाली आहे. ही दोन्ही पदे देखील आमदार रोहित पवार यांच्या मर्जीने भरली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच सर्व प्रवक्त्यांची नव्याने नियुक्ती करण्यात येणार आहे.



## मोदींसारखे पीएम आजवर मिळाले नव्हते...

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्याने ठाणे या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तिन्ही सेनादलाच्या सन्मानार्थ या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पुन्हा एकदा जोरदार शक्तिप्रदर्शन केले असल्याचे दिसून आले. पहलगाम मध्ये आमच्या बहिणीचे कुंकू पुसले गेले. त्याचा ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून बदला घेतला गेला आहे. 'खून का बदला खून' आणि 'ईट का जबाब पत्थर से' आणि आता तर गोळी चालली तर त्याचा बदला तोफ चालवून दिला जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हणाले आहे. याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैनिकांचे देखील अभिनंदन करतो, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## नर्स प्रेयसीला कोयत्याने संपवले

**प्रियकराचा घेतला गळफास**

■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. १४ :**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात एका प्रियकराने कोयत्याने वार करत निर्घृण हत्या केली आहे. त्यानंतर स्वतः गळफास घेत आत्महत्या केली. शेखर दुधाणे आणि पौर्णिमा अशी मृताची नावे आहेत.

पौर्णिमा ही परळीतील राजेंद्र पॉलीक्लिनिक नर्सिंग होम रुग्णालयात नर्स म्हणून काम करत होती. तिचे शेखर दुधाणे यांच्यासोबत प्रेमसंबंध होते. दोघांमध्ये झालेल्या किरकोळ वादानंतर शेखरने तिच्यावर कोयत्याने वार केले. यामध्ये तरुणीचा जागीच मृत्यू झाला. यानंतर त्यानेही तिथेच गळफास घेत आत्महत्या केली.

## रस्त्यावरील मुलांसाठी फिरते पथक



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

राज्यातील रस्त्यावर राहणारी मुले, विशेषतः अनाथ, एकल किंवा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित बालकांसाठी महिला व बालविकास विभागाने ह्यमिशन वात्सल्यह्न अंतर्गत फिरते पथक ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

या योजनेतून रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे समुपदेशन, शिक्षण, आरोग्यसेवा, पुनर्वसन आणि व्यावसायिक मार्गदर्शन यांसारख्या सेवा दिल्या जातील. महिला व बालविकास विभागाने ही योजना २०२२-२३ पासून प्रायोगिक तत्त्वावर मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर आणि मुंबई उपनगर या सहा महानगरपालिका क्षेत्रांमध्ये यशस्वीरित्या राबवली होती. त्या अनुभवाच्या आधारे आता संपूर्ण राज्यातील २९ महानगरपालिका क्षेत्रात ही योजना लागू केली जाणार आहे.

रस्त्यावर राहणारी मुले ही केवळ सरकारची नव्हे, तर समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यांना शिक्षण, आहार, वैद्यकीय सेवा आणि सामाजिक सुरक्षा देणारी फिरते पथक योजना ही सेवा नव्हे, तर बदलाची चळवळ आहे. प्रत्येक मुलाच्या चेहऱ्यावर हास्य आणणे हेच या योजनेचे खरे यश ठरेल, असे आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील ३१ फिरते पथक व्हॅन्स कार्यान्वित करण्यासाठी ८ कोटी रुपयांचा आर्थिक प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या व्हॅन्सद्वारे मुलांच्या पुनर्वसनासाठी वेगवेगळ्या सेवा पुरविल्या जातील. पुढील टप्प्यात नगरपरिषद क्षेत्रांमध्ये, तसेच धार्मिक स्थळे, देवस्थाने यांसारख्या ठिकाणीही ही सेवा सुरू होणार आहे.

# सर्व शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षक, तक्रार पेटी बंधनकारक

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी थेट शाळा व्यवस्थापनावर

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :**

बदलापूर येथील खासगी शाळेत दोन बालकांवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना लागू केल्या आहेत.

आता राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, आणि तक्रार पेटी उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी थेट शाळा व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंबंधीचा शासन निर्णय (जीआर) मंगळवारी जारी केला. याअंतर्गत प्रत्येक शाळेत विद्यार्थी सुरक्षित राहावेत यासाठी ठोस उपाययोजना अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बदलापूरच्या शाळेतील घटनेनंतर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवानिवृत्त न्यायाधीश साधना एस. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. शालिनी फणसाळकर- जोशी यांच्या सह अध्यक्षतेखाली विभागाच्या २६




सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली. न्यायालयाच्या ३ सप्टेंबर, २०२४ रोजी पारित केलेल्या आदेशा मध्ये नमूद केल्याप्रमाणे समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली. सदर समितीचा अहवाल समितीचे सदस्य सचिव तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्या २५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

समितीने त्यांच्या अहवालाद्वारे केलेल्या शिफारशी या शालेय शिक्षण व क्रीडा विभागासह महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, परिवहन विभाग इत्यादी विभागांशी संबंधित आहेत. समितीने केलेल्या शिफारशींपैकी बहुतांश शिफारशी या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित आहेत.

**शाळांची जबाबदारी**

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अंतर्गत १८ वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना संरक्षण मिळावे यासाठी शाळांना कायदेशीर जबाबदाऱ्या बजावाव्या लागणार आहेत. कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचाराची माहिती मिळताच स्थानिक पोलिस स्टेशन किंवा विशेष किशोर पोलिस पथकाला कळवणे अनिवार्य राहील.

शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणा?या अत्याचाराची तक्रार पास्को इ बॉक्स व चिराग या ॲपवर करणे यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी, सर्व शाळा परिसरात कंपाऊंड वॉल, सकाळ, दुपारी व शाळा सुटताना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद घ्यावी, विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना मेसेज करावा, विद्यार्थ्यांचे समुपदेशन, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणे बंधनकारक, विद्यार्थी ज्या बसेस मधून ये जा करणार त्या बस चालकाची पडताळणी, बस मध्ये जीपीएस प्रणाली बसवणे, प्रसाधनगृह व स्वच्छतागृहांची नियमीत स्वच्छता ठेवणे आदी बाबत निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## मुंबईला मिळाला पहिला केबल स्टेड रोड ओवर ब्रिज; महाराष्ट्र लवकरच फाटकमुक्त होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई प्रतिनिधीः

मुंबईतील वाहतूक आणि रेल्वे प्रवास अधिक गतिमान आणि सुरक्षित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत, महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (महारेल) ने मुंबईतील पहिला केबल स्टेड रोड ओवर ब्रिज पूर्ण केला आहे. रे रोड आणि टिटवाळा येथील या दोन नव्या पूलांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाले.

या वेळी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ₹महाराष्ट्राला लवकरच रेल्वे फाटकमुक्त करणार असल्याचा निर्धार सरकारने केला आहे. महारेलच्या माध्यमातून आतापर्यंत ३२ पूल पूर्ण करण्यात आले असून, या वर्षाअखेरपर्यंत आणखी २५ पूल पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हे फक्त पायाभूत सुविधा नाहीत, तर शहरांच्या प्रगतीची नवी ओळख निर्माण करणारी आकर्षक वास्तू आहेत,₹ असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# शिरसाळा गावात, मातृ दिन कार्यक्रम उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगांव**- प्लान इंडिया, सेल्फकेयर फॉर न्यू मोम्स अँड किट्स अंडर ५ या प्रकल्प अंतर्गत, ग्रामपंचायत शिरसाळा गावात, बुद्ध विहार येथे मातृदिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

मातृ दिनानिमित्त गावातील मातांना मातृ दिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, विविध खेळ, गीतांच्या माध्यमातून महिलानी मातृदिनचा आनंद घेतला.

कार्यक्रमात एकूण ८५ ह माता गर्भवती माता, स्तनदा माता, किशोरी मुली उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दरम्यान मातांना आरोग्य पोषणा



विषयी माहिती देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या .तसेच शारदा इंगोले, उपसरपंच, बेबी विजय इंगोले, ग्रामसंघ अध्यक्ष, संगीता रामचंद्र गायकवाड, एप्उअध्यक्ष, उपस्थित होत्या व उपस्थित असलेल्या पाहुण्यांनी मातृ दिन बद्दल आपले मनोगत व्यक्त केले व मुलींनी आई वर सुंदर गीत प्रस्तुत केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी गौरी गायकवाड, अशा कार्यकर्ता, व वैशाली जाधव प्रकल्पाचे ब्लॉक ऑफिसर भूषण कोल्हे व गुलाबी दीदी अंगणवाडी सेविका आरोग्य कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# वन्यजीव संरक्षणाच्या नावावर केवळ ढोंग; वाशिम वनविभागाची निष्क्रियता धक्कादायक!

▶ विनोद तायडे ▶

**वाशीम** - मंगरूळपीर तालुक्यातील जोगलदरी येथे शुक्रवारी एक भला मोठा नर नीलगाय पाण्याच्या शोधात विहिरीत पडला आणि संपूर्ण तालुक्याच्या संवेदनांना धक्का बसला. ही घटना समजताच वनविभाग हलला खरा, पण त्यांच्या रेस्क्यू मोहिमेने विभागाची पूर्ण बेफिकीरी, अकार्यक्षमता आणि ढिसाळ नियोजन उघडं पाडलं. कोटींचं बजेट, पण एक धड दोरीसुद्धा नसल्याचे दिसून आले. वर्षानुवर्षे वन्यजीव संवर्धनाच्या गोंडस





गप्पा मारणाऱ्या वाशिम उपवनसंरक्षक प्रादेशिक वनविभागाकडे रेस्क्यूसाठी ना धड साधनं आहेत, ना प्रशिक्षित कर्मचारी! लाखो रुपये खर्चून विकासकामांची गिरीशिखरे दाखवणाऱ्या या विभागाकडे एका जीवाला विहिरीतून बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेली साधी यंत्रणाही उपलब्ध नाही, ही लज्जास्पद बाब आहे. ज्यांना रेस्क्यू करायचं आहे त्यांच्याकडे ना क्रेन, ना जाळी, ना अगदी शिस्तबद्ध योजना - मग वनविभागाच्या नावाखाली हे नेमकं काय चाललं आहे? यंत्रणा नसल्यामुळे थातूरमातूर पद्धतीने आणि स्थानिक नागरिकांच्या जीवावर उदार होऊन नीलगायला वाचवण्यात यश आलं. या मोहिमेतील अनभिज्ञता आणि घोळ पाहून उपस्थित लोकांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले ही.रेस्क्यू की सर्कस? असा संतप्त सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे. प्रत्येक घटना ही विभागासाठी केवळ छायाचित्र आणि 'प्रेसनोट'पुरती मर्यादित राहते. रिअल ॲक्शनच्या वेळेस विभाग सपशेल अपयशी ठरतो. वन्यजीवांच्या रक्षणासाठी खर्च झालेल्या निधीचा ठावठिकाणा नाही, त्याचा उपयोग काय झाला यावर वनविभाग गप्प का? हा कसला विभाग हा तर फोटोसेशन' पुरता वनविभाग? असल्याचे दिसून येत आहे

निसर्ग स्पर्श फाउंडेशनचे सचिव गौरव कुमार इंगळे यांनी या रेस्क्यूबाबत वनकर्मचाऱ्यांचे कौतुक करताना वनविभागावर जहाल टीका केली. 'कोणत्याही प्रकारची सुसज्ज यंत्रणा नसताना वर्षानुवर्षे केवळ कागदोपत्री काम केले जात आहे. खऱ्या संकटाच्या वेळी हा विभाग झोपेत असतो की काय?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हा एक रेस्क्यू नव्हे, ही वन विभागाच्या फसव्या व्यवस्थेची गाथा आहे. एखाद्या जीवाचा जीव वाचला म्हणून आनंद होतो, पण यंत्रणा नसती तर काय झालं असतं? एक शासकीय विभाग इतका ढिसाळ कसा असू शकतो? या घटनेनंतर जनतेत प्रचंड संताप आहे. वन्यजीवांच्या नावावर लाखो-कोट्यवधींचा निधी खर्च करणाऱ्या यंत्रणेला जबाबदार धरण्याची वेळ आली आहे. केवळ सरकारी अहवालांमध्ये नव्हे, तर जमिनीवर 'संवर्धन' दिसायला हवे. नाहीतर उद्या नीलगाय नव्हे, तर वाघ, बिबट्या, किंवा दुसरे एखादे प्राणी मृत्यूमुखी पडल्यावरच वनविभाग जागा होणार काय? हा जीव वाचला, पण वनविभागाची सिस्टीम मरत चालली आहे!

## शेंदुर्जना ग्रापं प्रशासनाच्या बेजबाबदार धोरणापाई नागरिकांचा गळा पाण्याअभावी सुकला.

▶ महासागर प्रतिनिधी ▶



मानोरा- तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असलेल्या व जवळपास ५००० लोकसंख्या असलेल्या गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भर उन्हाळ्यामध्ये मोठी कसरत करावी लागत असून पंधरा पंधरा दिवस पाणी येत नसल्याने पेयजलाशिवाय जीवन कसे जगावे असा भला मोठा यक्षप्रश्न या गावातील नागरिकांसमोर आ वासून उभा आहे.

शासनाकडून जलजीवन मिशन योजने अंतर्गत गावामध्ये नवीन पाईपलाईन टाकून घरोघरी नळ जोडणी केलेली आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन टाकीचे बांधकाम करण्यात आलेले असून ईंगलवाडी येथील धरणातून पाणीपुरवठा करनाऱ्या टाकीमध्ये पाणी साठविण्यासाठी जलवाहिनी सुद्धा टाकण्यात आलेली असताना ग्रामपंचायत प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे स्थानिक नागरिकांना सातत्याने पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याची स्थिती भर उन्हाळ्यात निर्माण झालेली आहे.

सार्वजनिक नळ असलेल्या ठिकाणी स्थानिक नागरिकांना पिण्याचे पाणी भरण्यासाठी तासानतास पाण्याची वाट पाहत ताटकळावे लागत असल्याची परिस्थिती या गावात निर्माण झालेली आहे.

## दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

▶ महासागर प्रतिनिधी ▶



**वाशिम**- जिल्ह्यातील मौजे तामसी आणि इतर ग्रामपंचायतींमध्ये दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत आज दिव्यांग प्रतिनिधींच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या ५ टक्के हक्काच्या निधीचे तात्काळ वाटप करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

ही मागणी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन चे कार्यकर्ते सिताराम डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. निवेदनात असे नमूद करण्यात आले की, वाशिम जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायती अजूनही दिव्यांग नागरिकांना ५ टक्के निधीचा लाभ देत नाहीत. तसेच, दिव्यांग व्यक्तींना घरकरामध्ये (हाउस टॅक्स) ५०इ सवलत देण्याची अट फक्त 'कुटुंबप्रमुख' असलेल्या व्यक्तींनाच लागू केली जात आहे, जी पूर्ण पणे अन्यायकारक आहे. पुणे जिल्हा परिषदेने दिव्यांग व्यक्तींचा घरकर १०० टक्के माफ करण्याचा निर्णय घेतलेला असताना, वाशिम जिल्हा परिषदेने देखील अशाच प्रकारचा ठराव मंजूर करून घरकर आणि पाणीपट्टीतून दिव्यांग बांधवांना पूर्णतः सूट द्यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय, धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना दिव्यांग व्यक्तींना तत्काळ लागू करण्यात यावी, व त्यासाठी स्वतंत्र अनुदान वाटप करण्यात यावे, असेही निवेदनात सांगण्यात आले. या वेळी प्रमुख उपस्थितांमध्ये महिला वाशिम जिल्हा प्रमुख गंगुबाई बाबाराव पवार, सुभाष रणबावळे, अविनाश मोपकर, लक्ष्मी डव्हळे, पुनम डोंगरदिवे, दत्ता ढोले, सुरज डोंगरदिवे, पार्वतीबाई डोंगरदिवे, गणेश सरकटे यांच्यासह इतर अनेक दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी सांगितले की, जर वरील मागण्या लवकरात लवकर पूर्ण झाल्या नाहीत, तर दिव्यांग बांधवांकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## उपजिल्हा रुग्णालय कारंजा येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

▶ महासागर प्रतिनिधी ▶



**कारंजा** - १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती करंजा ग्रामीण रुग्णालय येथे साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित डॉ. एन.आर साळुंखे वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय कारंजा लाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व पूजन करून कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली.

दरवर्षी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती सोहळा साजरा केला जातो. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराजांची तारखेनुसार जयंती असून, यानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून राजेंना विनम्र अभिवादन केले जाते. मराठा साम्राज्याचे दुसरे शासक आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे शिवाजीराजे भोंसले यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुण्याजवळील पुरंदर किल्ल्यावर झाला. यावेळी डॉ. साळुंखे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक, धर्मनिष्ठा आणि देशभक्तीचे प्रेरणास्थान छत्रपती संभाजी महाराजांना होते. त्यांच्या जयंती निमित्त शतशः प्रणाम करतो.

हे वेळी उपस्थित सतीश साळुंखे कनिष्ठ लिपिक ,बळीराम राठोड कनिष्ठ लिपिक, सोपान ताबेराव लॅब टेक्निशियन, मोहम्मद इद्ररिस शेख, सिकलसेल टेक्निशियन,स्मिता देशपांडे टेक्निशियन, रामेश्वर खंडागळे प्रयोगशाळा सहाय्यक, क्षयरोग विभागाचे राजेश चव्हाण, चेतन वाचनिक ब्लड बँक अधिकारी, प्रदिप पट्टेबहादूर टी. बी विभाग पी. पी एस. सी क्षेत्रकार्य अधिकारी, नूतन मिश्रा लॅब टेक्निशियन,अजय यवतकर डाटा एन्ट्री ऑपरेटर, यांची उपस्थिती होती.

## शिवाजी हायस्कूल किन्हीराजा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

▶ महासागर प्रतिनिधी ▶



मालेगाव - मार्च २०२५ च्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित, श्री शिवाजी हायस्कूल किन्हीराजा येथील विद्यार्थ्यांनी यंदाही यशाची भरारी घेऊन विद्यालयाचा नावलौकिक टिकवून ठेवला आहे . त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

यावर्षी शाळेचा एकुण निकाल ९०.५२टक्के इतका लागला आहे. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार समारंभ दिनांक १४ मे रोजी शाळेत आयोजित करण्यात आला. शाळेची विद्यार्थिनी सलोनी सुधाकर हटकर हिने ८८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

दिव्या गजानन नागरे ८५.०० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला, तर वैष्णवी घमराव घुगे ही ८२.२०टक्के गुण मिळवून तृतीय आली. रुग्वेद गणेश घुगे ८१.८०टक्के, प्रिती गजानन शेटे ८१.२०टक्के, ममता गणेश नागरे ८०.००टक्के, तनवी संदिप नागरे ७९.८०टक्के गुण मिळवून यश संपादन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाळा समिती पदाधिकारी व शाळा तपासणी अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कर्जमुक्ती अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांची झुंबड

▶ महासागर प्रतिनिधी ▶



मानोरा - किसान ब्रिगेडच्या वतीने कर्जमुक्तीचे अर्ज दि. १४ एप्रिल रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शेकडो शेतकऱ्यांनी तहसीलदार डॉ संतोष यावलीकर यांना दिले.

भाजपा महायुती घटक पक्षांनी विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना सात बारा कोरा करण्याचे जाहीर नाम्यात उल्लेख केला होता. तसेच जाहीर प्रचार सभेत कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते. मात्र महायुतीची सत्ता स्थापन होवून सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटला तरी कर्जमुक्तीबाबत सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. उलट महायुती घटक पक्षातील नेते शेतकऱ्यांना कर्ज भरणा करण्याचे सुतोवाच करीत आहे. दिलेल्या आश्वासनाची पूर्तता व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकनायक, शेतकरी नेते प्रकाश भाऊ पोहरे यांनी किसान ब्रिगेडची स्थापना करून कर्जमुक्ती अर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले होते.

त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेकडो शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती अर्ज तहसीलदार याजकडे सादर केले. वैश्विक तापमान बदलामुळे दरवर्षी येणारी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हतबल झाले आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतीमालाचे भाव सतत पडले आहे. तसेच कृषी मालवरील जीएसटी आकारणी मुळे उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. दिवसेंदिवस शेतकरी कर्जबाजारी होत असल्याने आत्महत्या करण्यास परावृत्त होत आहे. त्यामुळे सत्ताधारी महायुती घटक सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्या संदर्भात ठोस पावले उचलावीत, यासाठी शेतकरी पेटून उठला आहे. निवेदन देतेवेळी शेतकरी संतोष आनंदराव खुपसे, चैतन्यशील भावराव खुपसे, अशोक शामराव हांडे, पांडुरंग तुकाराम आखुड, किशोर बाबुलाल रुमकर, गजानन पांडुरंग देशमुख, विजय कृष्णा राठोड, कसनदास कनीराम पवार, प्रविण कसनदास पवार, विवेक मारोती काळेकर, पार्वतीबाई लक्ष्मण परस्कार्य, रामराव तुकाराम गटले, तुकाराम रघुजी गटले, महादेव गंगाराम घोडे, धनराज रामकृष्ण पेटकर, दैवीशील भावराव खुपसे, रविंद्र मोहन पवार, चंदाबाई रवींद्र पवार, कैलास वसंतराव चिस्तलकर आदीसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## दहावी परीक्षेत मानोरा तालुक्याचा निकाल ९४. ८६ टक्के

▶ महासागर प्रतिनिधी ▶



मानोरा - माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे वतीने घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा ऑनलाइन निकाल दि. १३ मे रोजी जाहीर करण्यात आला. त्यात तालुक्याचा निकाल ९४.५८ टक्के लागला आहे.

२१८९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. एकूण २१६४ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यापैकी २०४९ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. यशवंतराव चव्हाण विद्यालय वॉर्ड गिरडा १०० टक्के, गजाधर राठोड आश्रम शाळा इंगलवाडी ९८. ५२ टक्के, श्री वसंतराव नाईक विद्यालय पाळोदी धोनी ९४.४४ टक्के, आप्पास्वामी विद्यालय शेंदूरजना आढाव ९८. १४ टक्के, मातोश्री शेवंताबाई आश्रम शाळा विलेगाव १०० टक्के, श्री अंबिका विद्यालय गव्हा ९३.२४ टक्के, श्री किसनराव हाय स्कूल पोहरादेवी ९४. ०५ टक्के, जय बजरंग विद्यालय भुली ९४. १२ टक्के, जिल्हा परिषद वसंतराव नाईक विद्यालय विठोली ९७. १४ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय उमरी बु ८४. ४४ टक्के, स्व लक्ष्मणराव देशमुख विद्यालय कारखेडा १०० टक्के, वसंतराव विद्यालय वरोली ९७.८७ टक्के, वसंतराव नाईक बेसिक आश्रम शाळा फुलउमरी ८८. ४६, तपस्वी काशिनाथ बाबा स्कूल अमरगड ८१.६० टक्के, श्रीमती काशीबाई विद्यालय सोयजना ८७.५० टक्के , समता विद्यालय कुपटा ८८. ५७ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय मानोरा ९५.६८ टक्के , एल एस पी एम हाय स्कूल धामणी मानोरा ९७. ७२ टक्के , राष्ट्रमाता इंदिरा गांधी कन्या विद्यालय मानोरा ९७. ५३, रहेमानिया उर्दू हाय स्कूल मानोरा ९७.५० टक्के, सुलेमानिया उर्दू हाय स्कूल मानोरा ९५ टक्के, श्री मुंगसजी महाराज हाय स्कूल इंझोरी ९५. ४५ टक्के, श्री वसंतराव नाईक विद्यालय भोयणी ५० टक्के, वसंतराव नाईक स्कूल दापुरा ८२. २२ टक्के, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय म्हसणी ६६.६६ टक्के , श्री भगवंतराव विद्यालय गिरोली ९६.४२ टक्के, श्री बाबनाजी महाराज हाय स्कूल कोडोली ९५. ६५ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय साखरडोह १०० टक्के, श्री वामन महाराज कन्या विद्यालय कोलार १०० टक्के, श्री गजानन महाराज विद्यालय हिवरा बु ९५. २३ टक्के, श्री माधवराव पाटील विद्यालय कारली ९८.४१ टक्के, जगदंबा माध्यमिक शाळा महागव्हाण पारवा १०० टक्के, श्री सोहमनाथ विद्यालय आसोला खुर्द ९१. ९३, प्रशिक विद्यालय धावंडा १०० टक्के, वाघामाय आदिवासी माध्य विद्यालय रुई जोसता ९८.६८ टक्के, मुंगसाजी महाराज आश्रम शाळा शिवानी ८७. ५० टक्के, तारिक अन्वर उर्दू हाय स्कूल गिरोली १०० टक्के, रहेमानिया उर्दू हाय स्कूल कुपटा ९५ टक्के, लोकहित माध्यमिक शाळा मानोरा १०० टक्के, प्रशिक माध्यमिक विद्यालय राहुल पार्क मानोरा ८८. ८८ टक्के, संत वामन महाराज इंग्लिश धामणी मानोरा १०० टक्के , चिंतामणी प्रायमरी इंग्लिश स्कूल मानोरा ९४. ६८ टक्के असा निकाल लागला आहे. डिस्टिंक्शन उत्तीर्ण मध्ये ७१९,

ए ग्रेड मध्ये ८३२, बी ग्रेड मध्ये ४१८ व पास ग्रेड मध्ये ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ४१ पैकी १० शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

## श्रीमती सरस्वतीबाई राऊत इंग्रजी शाळेचा उत्कृष्ट निकाल

▶ महासागर प्रतिनिधी ▶



**शेलूबाजार** - येथील श्रीमती सरस्वतीबाई राऊत इंग्रजी शाळेचा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १०० टक्के निकाल लागला असून कु.अस्मिता सुमेध खाडे हिने ९६ इटक्के घेऊन केंद्रातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. यशाची परंपरा कायम जपत एस.आर.स्कूलने याही वर्षी केंद्रातून प्रथम येण्याचा मान मिळवला व १००इनिकाल शाळेचा लागला आहे.

यामध्ये राणी किशोर टोंचर ९५.८०टक्के , सृष्टी पुरुषोत्तम राऊत ९५.८०टक्के, सेजल प्रवीण राठोड ९५.८०टक्के,राधा सचिन सुर्वे ९५.६०टक्के,घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. एस.आर.स्कूल मधून एकूण ८३ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. शाळेचा त्यापैकी ९०टक्के च्या वर ५२ विद्यार्थी ८५टक्के टक्क्याच्या वर १७ विद्यार्थी. तसेच उर्वरित सर्व विद्यार्थी ८० टक्के च्या वर गुण घेऊन घवघवीत यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे संचालक उद्धव राऊत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शितल राऊत तसेच शिक्षक वृंद व आपल्या आई-वडिलांना दिले आहे.शाळेच्या अध्यक्षांनी या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व कौतुक केले.

# पाटणी चौकातील अतिक्रमण हटविण्याची संयुक्त मोहीम सुरू

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - शहरातील वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या आणि गेल्या अनेक दिवसांपासून वादग्रस्त ठरलेल्या पाटणी चौकातील अतिक्रमण हटविण्यासाठी अखेर १३ मेपासून नगरपरिषद, पोलीस प्रशासन आणि परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईमुळे मुख्य रस्ते मोकळे झाले असून, शहरवासीयांनी यामुळे मोठा दिलासा व्यक्त केला आहे.





पाटणी चौक परिसरात फेरीवाले, भाजीपाला विक्रेते तसेच लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केल्यामुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी होत होती. यामुळे वाहनधारकांसह पादचाऱ्यांना देखील मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. इतकेच नव्हे तर अपघातांची शक्यताही वाढली होती. याच कारणामुळे १२ मे रोजी दोन गटांमध्ये वाद झाला आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेचा गांभीर्याने घेत, झालेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत पाटणी चौकातील अतिक्रमण तत्काळ हटविण्याचा निर्णय घेण्यात आला.

पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी श्री. गायकवाड, परिवहन विभागाचे अधिकारी आणि संबंधित विभागांशी समन्वय साधून कारवाईचे आदेश दिले. सायंकाळी पाच वाजल्यापासून ही मोहीम जोरात सुरू झाली. अतिक्रमण हटवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले होते आणि यामध्ये पोलीस, नगर परिषद कर्मचारी, वाहतूक विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. अतिक्रमण हटविल्यानंतर मुख्य रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत झाली असून, नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. 'आता या भागातून जाणे सुलभ झाले आहे. इतके दिवस मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते,' असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले.दरम्यान, हटविण्यात आलेल्या फेरीवाल्यांना बालाजी मार्केट आणि महात्मा फुले मार्केट येथे पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे. यापुढे अशा प्रकारचे अतिक्रमण झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशी कारवाई सातत्याने होणे गरजेचे आहे, असे मत स्थानिक व्यापारी संघटनांनीही व्यक्त केले. ही मोहीम केवळ एकदाच नव्हे, तर दीर्घकालीन स्वरूपात राबविण्यात यावी, हीच नागरिकांची आणि व्यापाऱ्यांची एकमुखी मागणी आहे.

# शस्त्रसंधी कुणासाठी?




**इंडिया कॉलिंग**

**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू करताच अवघ्या चार दिवसांत भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी जाहीर झाली. पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर आणि पाकिस्तानच्या हवाई तळांवर भारताकडून हवाई हल्ले होत असताना अचानक शस्त्रंसंधीची घोषणा झाल्याने देशातील जनतेला मोठा आश्चर्याचा धक्काच बसला.

भारताने शस्त्रसंधी स्वीकारली असली तरी ती मनापासून नाही हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसून आले. यापुढे बंदुकीच्या गोळीचे उत्तर तोफेच्या गोळ्याने देण्यात येईल असा खणखणीत इशाराच त्यांनी पाकिस्तानला दिला आहे. न्युक्लिअर ब्लॅकमेलिंगला आम्ही किंमत देत नाही असेही त्यांनी पाकला ठणकावले आहे.

पाकिस्तानशी चर्चा झालीच, तर ती केवळ दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर या मुद्द्यावरच असेल. दहशतवाद आणि संवाद एकाच वेळी होऊ शकत नाहीत, दहशतवाद आणि व्यापार हे एकत्र चालू शकत नाहीत. पाणी आणि रक्त एकाच वेळी वाहू शकत नाही. अशा भाषेत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत.

ऑपरेशन सिंदूर थांबल्याची घोषणा झाल्यावर पंतप्रधान मोदींनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात आक्रमकता होती, आवेश होता, दहशतवादाचा बदला घेणारच अशी जबरदस्त उर्मी होती.

दहशतवादी कारवायातून भारतात रक्तपात घडविणाऱ्या पाकिस्तानवर विश्वास कसा ठेवायचा हाच कळीचा मुद्दा आहे. देशाची फाळणी झाल्यापासून पाकिस्तानमध्ये कधीच शांतता नांदलेली नाही. पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद गेली सहा दशके देशात हिंसाचाराचे थैमान घालतो आहे.

भारत- पाकिस्तान या दोन्ही देशांनी शस्त्रसंधी स्वीकारल्यानंतर दोन्ही देशांच्या सरहद्दीवर चालू असलेले गोळीबाराचे व बॉम्बगोळ्यांचे आवाज काहीसे शांत झाले. एकमेकांवर होणारा ड्रोनचा मारा थंडावला. पहलगाम हत्याकांडानंतर दोन्ही देशांत कमालीचा तणाव वाढला होता. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला जबर हादरा दिला होता.

भारतीय सेना पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्यासाठी सक्रिय असताना अचानक जाहीर झालेल्या शस्त्रसंधीमुळे कोट्यवधी भारतवासीयांना आश्चर्याचा धक्काच बसला. हिंसाचार, दहशतवाद आणि मानवी रक्ताची चटक लागलेल्या पाकिस्तानवर विश्वास कसा ठेवायचा? याच प्रश्नाने काहूर निर्माण केले आहे.

देशाची फाळणी झाल्यापासून भारताने पाकिस्तानबरोबर अनेकदा समझौते आणि संघर्ष विराम करण्यासाठी प्रयत्न केले. शस्त्रसंधीच्या प्रस्तावाला मान्यता दिली. पण घुसखोरी आणि पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद कधीच थांबला नाही. भारताने पाकिस्तानला आजवर अनेकदा माफ केले आहे.

पहलगाम हत्याकांडात २६ भारतीय महिलांना विधवा केल्यानंतरही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका ट्वीटवर ऑपरेशन सिंदूर ठप्प होते, हे आश्चर्यकारक आहे.

भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीनंतर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. भारतीय सेना पाकिस्तानी दहशतवादाचा बिमोड करीत असताना, ड्रोन व क्षेपणास्त्रांसह शत्रू राष्ट्रावर विलक्षण वेगाने झेपावत असताना अचानक लाल झेंडा कशासाठी दाखवला गेला?

ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यावर पाकिस्तानमध्ये रोज मोठी पडझड होत होती. भारताच्या लष्करी सुसज्ज सामर्थ्यापुढे आणि भक्कम अर्थव्यवस्थेपुढे पाकिस्तानचा किती निभाव लागू शकणार?

ऑपरेशन सिंदूरने चार दिवसांत पाकिस्तानचे महाप्रचंड नुकसान केले. पाकिस्तानचे असंख्य सैनिक ठार झाले. पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रावर मोठे हल्ले झाले. पाकची अनेक ठिकाणी रडार सिस्टीम उद्धवस्त झाली. अनेक ठिकाणी संरक्षण प्रणाली कोलमडून पडली. भारताने नऊ दहशतवादी तळ हवाई हल्ले करून उद्धवस्त केले, त्यात १००पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले.

दहशतवादाचा निषेध म्हणून भारताने सुरुवातीला राजनैतिक विरोध केला. नंतर व्यापार-आयातझनिर्यात बंद करून पाकवर आर्थिक निर्बंध लादले. सतलज नदीचे पाणी बंद केले. पाकिस्तानी नागरीकांना देशातून बाहेर काढले.

सैन्य दलाची तैनाती केली. नंतर सर्जिकल स्ट्राइक व एअर स्ट्राइक केले. मग जमिनीवरून तसेच नौदल व हवाई दलाचे हल्ले केले. ब्रम्होसच्या प्रखर हल्ल्यानंतर पाकिस्तानचे धाबे दणाणले. ब्रम्होस क्षेपणस्त्राची रेंज २९० किमी. आहे आणि २५०० किमी वेगाने हल्ला करू शकते.

पाकिस्तानने जम्मू- काश्मीर, पंजाब, राजस्थान, गुजरातमधील भारतीय लष्करी तळांवर क्षेपणस्त्रांनी हल्ले चढवले पण प्रत्येक क्षेपणस्त्राला भारताने अडवले व ते निष्क्रीय केले. दोन्ही देशांत अण्वस्त्र क्षमता आहे. आण्विक हल्ले झाले, तर मोठा नरसंहार होईल असे वातावरण निर्माण झाले. म्हणूनच तातडीने शस्त्रसंधी व्हावी यासाठी पाकिस्तानने अमेरिकेकडे मदतीकरता धाव घेतली. ऑपरेशन सिंदूरने स्पष्ट संदेश दिला आहे की, भारत आपल्या आकाशाचे संरक्षण करण्यासाठी केवळ सक्षम नाही, तर तो त्याच्यावर नियंत्रण ठेवतो...

भारत-पाकिस्तान शस्त्रसंधी झाली याचे श्रेय अमेरिकेने घाईघाईने जाहीरपणे घेतले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्वीट करून आणि वॉशिंग्टन डीसी येथे पत्रकार परिषद घेऊन भारत-पाकिस्तान दरम्यान आम्ही युद्ध थांबवले असे जगाला सांगितले. दोन देशांत अण्वत्र युद्ध झाले असते, तर लाखोंचा नरसंहार झाला असता, तो आम्ही थोपवला असा त्यांनी दावा केला.

युद्ध थांबवले नाही तर आम्ही व्यापार करणार नाही, असा इशारा आपण दोन्ही देशांना दिल्याचेही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ही शस्त्रसंधी कायमस्वरूपी राहील असे सांगून यापुढे अमेरिकेचे बारीक लक्ष भारत-पाकिस्तानवर राहील असे त्यांनी सुचित केले आहे.

अमेरिकेने आपला अजेंडा भारत व पाकिस्तान दोन्ही देशांच्या गळी उतरवला आहे, असाच संदेश जगभर गेला आहे. पंतप्रधान मोदींनी दि. १२ मे रोजी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात अमेरिका किंवा डोनाल्ड ट्रम्प हे शब्दही उच्चारले नाहीत. शस्त्रसंधी जारी व्हावी यासाठी अमेरिकेने मध्यस्थी केली असे त्यांनी चुकूनही म्हटले नाही. किंबहुना त्यांनी आपल्या भाषणात अमेरिकेची दखल सुद्धा घेतली नाही.

शस्त्रसंधी का झाली याचे कारण सांगताना ट्रम्प आणि मोदी यांची भूमिका पूर्ण वेगळी दिसली. पाकिस्तानचे डायरेक्टर जनरल मिलिटरी ऑपरेशन यांनी भारतीय सेनेशी संपर्क साधला. त्यांनी भारताला शस्त्रसंधी करण्याची विनंती केली. यापुढे पाकिस्तान दहशतवादी कारवाया किंवा लष्करी धाडस करणार नाहीत असे त्यांनी आश्वासन दिले म्हणून भारताने शस्त्रसंधी मान्य केली.

पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्यांने केलेल्या फोनवर विश्वास ठेऊन शस्त्रसंधी कशी स्वीकारली जाऊ शकते? एवढा मोठा निर्णय घ्यायचा, तर दोन्ही देशांच्या पंतप्रधानांमध्ये व संरक्षणमंत्र्यांमध्ये तसेच लष्कर प्रमुखांमध्ये समोर अजेंडा ठेऊन चर्चा व्हायला पाहिजे होती.

अमेरिकेने मध्यस्थी केली नाही किंवा ट्रम्प यांचे म्हणणे चुकीचे आहे असेही भारताने म्हटलेले नाही. दुसरीकडे ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याबद्दल पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरिफ यानी त्यांचे आभार मानले आहेत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच मध्यस्थीसाठी पुढाकार घेतल्यामुळे भारताला शस्त्रसंधी स्वीकारणे भाग पडले काय हे भारताने अद्याप स्पष्ट केले नाही. शस्त्रसंधी झाल्यावर पाकमधे जल्लोष सुरू झाला.

भारताने शस्त्रसंधी स्वीकारल्याचे जाहीर करण्यापूर्वीच अमेरिकेच्या अध्यक्षांनी ट्वीट करून दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करण्याचे मान्य केले आहे हे जगाला सांगितले. तसेच मोदींच्या भाषणाच्या तासभर अगोदर ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन शस्त्रंसधी न केल्यास आपण व्यापार बंद करू असा दोन्ही देशांना इशाराही दिला. काश्मीर प्रश्नात मध्यस्थी करण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकेने मध्यस्थी करावी असे भारताने कधीच म्हटले नव्हते. काश्मीर प्रश्नात मध्यस्थ कोणी असणार नाही हीच भारताची भूमिका आहे. मग डोनाल्ड ट्रम्प हे जागतिक पंचांच्या भूमिकेत का पुढे येत आहेत? शस्त्रसंधी व्हावी यासाठी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी व्हान्स तसे परराष्ट्रमंत्री मार्को रूबीओ यांनी रात्रभर भारत-पाकिस्तानच्या पराराष्ट्रमंत्री व परराष्ट्र सचिवांशी चर्चा केली. ऑपरेशन सिंदूर मोहीम तेजीत असताना पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून एक अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर होते हे सुद्धा आश्चर्यकारक आहे.

पाकिस्तान टेरर फॅक्टरी आहे, याचे पुरावे भारताने वेळोवेळी जगापुढे मांडले आहेत. मग पाकिस्तानच्या लष्करी अधिका?यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन भारताने शस्त्रसंधी स्वीकारावी हे सुद्धा अनाकलनीय वाटते.

ऑपरेशन सिंदूर नंतर अवघ्या चार दिवसांत भारत- पाकिस्तान शस्त्रसंधी झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी कायमची शस्त्रसंधी असे म्हटले असले तरी नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूरला तूर्तास स्थगिती असे म्हटले आहे. पाकिस्तानात मुसंडी मारताना व पाकिस्तानमधील दहशतवादी नेटवर्क उद्धवस्त करीत असताना भारताच्या कारवाईला एकदम ब्रेक लागला आहे.

ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला जबरदस्त धडा शिकवला का? पहलगाम किंवा पुलवामाचे दहशतवादी मिळाले का? बदला घेतला याचे समाधान प्राप्त झाले का? पाकिस्तानात घुसून मारू, चुन चुन के मारेंगे हे साध्य झाले का? पाकिस्तानवर विश्वास ठेवून भारताने ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित केले, पण ही शस्त्रसंधी कुणासाठी?

■ ■ ■

# नको मध्यस्थ... पीओकेच पुढचे लक्ष्य!

**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार**
**राजुरा. 9511215200**

ऑपरेशन सिंदुर ' ने पाकिस्तानला चांगला धडा शिकवला आहे. आंतकवाद्यांचे मनसुबे, कंबरडे मोडणे आणि पाकिस्तान लष्कराचा खरा चेहरा जगासमोर उघडा पाडणे हा या ऑपरेशनचा मुख्य हेतू होता.

पहेलगाम आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हे पाऊल उचललेले आहे. दहशतवाद्यांची खोड मेल्याशिवाय जात नाही हेच खरे. पाकिस्तानी आतंकवाद्यांना भारतीय सैन्यांनी खास करून वायुसेनेनी ' ऑपरेशन सिंदुर ' घडवून आणून चांगलीच अद्दल घडवली. काही मिनिटांतच भारतीय वायुदलातील फायटर जेट रॉफेल मधून मिसाईल ब्रम्होंस्त्र आपल्या शुरवीर पायलट कमांडरनी पाकिस्तानातील अनेक आतंकवादी तळांवर आणि मदरश्यांवर अचूकपणे डागून, हल्ला चढवून त्यांना नेस्तनाबूत केले. यात अनेक पाकिस्तानी आतंकवाद्यांना यमसदनी धाडले गेले.

आतंकवाद्यांना पाकिस्तानी लष्कराचे संपूर्ण सहकार्य मिळते आहे हे साऱ्या जगासमोर उघडे केले. तरीही अमेरिकेने आपले प्रस्थ वाढविण्यासाठी आणि जगावरील आपली पकड किती मजबूत आहे हे दाखवण्यासाठी यात नाक खुपसलेच. पाकिस्तान सैन्यदलांना भारतीय सैनिकांना तोंड देणे शक्य झाले नाही. म्हणून त्यांनी न्युक्लिअर हल्ल्याची भिती दाखवून अमेरिकेला यात ओढले.

अमेरिकेने आपला दबदबा राखण्यासाठी न्युक्लिअर हल्ल्याची भीती दाखवून आम्ही पीओके बाबत मध्यस्थी करण्यास तयार आहोत असे सांगून पाकिस्तानला सीजफायर करण्यास भाग पाडले. भारताने पणं नरमाईचे धोरण स्वीकारून तात्पुरती माघार घेतली.

भारतीय सैनिकांच्या कामगिरीने सारे जग आश्चर्यचकीत झाले. भारतीय सैनिकांसमोर पाकिस्तानचे सैन्य टिकाव धरू शकत नाहीत, हे साऱ्या जगाने अनुभवले. पहेलगाम हल्ल्याचा बदला म्हणून याकडे पाहता कामा नये. कारण पहेलगाम हल्याचे खरे सुत्रधार आणि हल्लेखोर भारताच्या हाती लागलेलेच नाहीत. भारतीय गुप्तचर यंत्रणांसमोरचे हे मोठे आव्हान आहे. एक गोष्ट आपणं लक्षात घेतली पाहिजे की भारतीय सेना ही बाहेरील आक्रमणं रोखण्यासाठी आणि त्याचा प्रतिकार करण्यासाठी सक्षम आहे. पाकिस्तान हे छुपे युध्द घडवून आणीत असते.

पाकिस्तान हितेशी लोकांची भारतात कमतरता नाही. तेच लोक पाकिस्तानला सर्वप्रकारची गुप्त माहिती पुरवीत असतात आणि त्या बदल्यात आर्थिक लाभ पदरात पाडून घेतात.भारतीय सैनिकांनाच हेच टार्गेट करीत असतात. याचा वाईट अनुभव आपणं जम्मू आणि काशिमर मध्ये घेतलेलाच आहे. भारतीय सैन्य आक्रमक पावित्र्यात असतांनाच ऑपरेशन सिंदुर थांबविण्यात आल्याने अनेकांना आश्चयार्चा धक्का बसला. भारत यावेळेस पीओके ताब्यात घेतल्याशिवाय माघार घेणार नाही असे सर्वांनाच वाटत होते. कारण चीन, तुर्की व काही मुस्लिम देश हे पाकिस्तान सोबत होते. अमेरिका, रशिया, जपान, इंग्लंड सारखे सैन्य दृष्टीने सक्षम असलेले देश हे भारताच्या बाजूने पहिल्यांदाच उभे असल्याचे चित्र दिसत होते.

असे असतांना पाकिस्तानने स्वतः ची अब्रु वाचवण्यासाठी अमेरिकेची मनधरणी करून एकतर्फी सीझफायरची घोषणा करून टाकली.यामुळे भारताला तोंडघशी पडावे लागले. विरोधकांच्या हाती अनायसे एक प्रबळ मुद्दा हाती लागला. सगळीकडून केंद्र सरकारवर शब्दांचा भडीमार सुरु झाल्याने केंद्र सरकारला व सैन्य दलांना आपली भुमिका स्पष्ट करावी लागली. ऑपरेशन सिंदुर हे थांबलेले नाही. ते सुरूच असणार आहे, असे स्पष्टीकरण द्यावे लागले.


भारतीय सैन्य कारवाईत पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणावर न भरून निघणारे नुकसान झाले. यात आतंकवादी अड्डे बेचिराख झालेत. बहावलपूर, मुरीद सारखे दहशतवादी प्रशिक्षण केंद्र आणि मुख्य कार्यालय उध्वस्त करण्यात आलेत.जैश-ए-मुहम्मद जिहादी इस्लामीक उग्रवादी संघटन(पाकिस्तानी पंजाब) प्रमुख मसूद अजहर यांचे संपुर्ण कुटूंब हवाई हल्लूयात मारले गेलेत. पाकिस्तान नेहमीच लश्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहमद, हिजबुल मुजाहिदीन, अलकायदा, आईएसआईएस, सिमी, जेकेएलएफ, पीएफ आय इत्यादी दहशतवादी संघटनांना पाकिस्तानात आश्रय देत आलेला आहे. यांच्या भरवश्यावर तेथील राजकारण हे चालत आलेले आहे.

या सापांची बीळे पाकिस्तानात असल्याने पाकिस्तानला आतंकवादी देश म्हणून जागतीक पातळीवर घोषित करणे गरजेचे झाले आहे.पाकिस्तानचे लष्कर याच्या आडून आलटून पालटून आपली सत्ता उपभोगत असते. हे राज आता लपून राहिलेले नाही.

पाकिस्तानचे सैन्यदल आणि अधिकारी भारतीय लष्करी कारवाईत मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचे शव दफन करतांना दफनभुमीत उपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांना शहीदांचा दर्जा देऊन त्यांचा दफनविधी सन्मानपूर्वक करण्यात आलेला आहे.हे सा-या जगाने पाहिले आहे. अश्या देशात कधीच शांतता प्रस्थापित होवू शकत नाही. कारण त्यांचा सत्तेचा पायाच चुकीचा आहे. म्हणून आतंकवाद्यांचे अड्डे कार्यरत असलेला पीऐके भारताला ताब्यात घेऊन त्यावर स्वनियंत्रण ठेवणे गरजेचे झाले आहे. आता भारताचे पुढील लक्ष्य पीओके आपल्या ताब्यात घेणे हेच असणार आहे. त्या दिशेने केंद्र सरकारची वाटचाल ही सुरू झालेली आहे. फक्त योग्य वेळेची वाट पहाणे सुरू आहे.

या कालावधीत आपला शत्रू वरचढ होणार नाही याची काळजी भारताला घ्यावी लागणार आहे. पाकिस्तान सरकार कडून दहशतवाद्यांना आर्थिक व सर्व प्रकारची मदत पुरविली जाणार आहे. त्यांचे आतंकी अड्डे पुन्हा उभारले जाणार आहेत. त्यांचे मनसुबे पुढे चालून भारत विरोधातच असणार आहेत. भारताने कुठल्याही परिस्थितीत गाफील राहून चालणार नाही. ही फार मोठी जोखीम ठरू शकते.

■ ■ ■




**कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**7132796683.**

चाफेकर बंधू हे आद्यक्रांतिकारी होते. त्यांची नावे दामोदर हरिपंत चाफेकर यांचा जन्म २४ जून १८६९, बाळकृष्ण हरिपंत चाफेकर यांचा जन्म १८७३ आणि वासुदेव हरिपंत चाफेकर यांचा जन्म १८८० अशी होती. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे ब्रिटीश प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करण्यात या क्रांतिकारकांचा सहभाग होता.

पुण्यातील जनता ही नियुक्त केलेल्या अधिकारी आणि सैनिकांच्या अत्याचारांनी त्रस्त होती. या हत्येत महादेव विनायक रानडे हेही साथीदार होते. वासुदेव हरिपंत चाफेकरांचा जन्म सन १८८०मध्ये चिंचवड मध्ये एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी मराठी भाषेमधून शिक्षण घेतले. कालांतराने ते पुण्यातील चिंचवड येथे स्थायिक झाले.

वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यांमुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला होता. वासुदेव चाफेकर यांनी दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर या बंधूंसह राजकारणात आणि क्रांतिकारी कारवायांमध्ये भाग घेतला. त्यांनी भारतीय तरुणांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले. पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरित होऊन हे भाऊ क्रांतिकारक चळवळीकडे वळले.

ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध टिळकांनी केसरीमधून घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली होती.

या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडने रोग निवारण करण्याच्या उपायांची सक्तीने अंमलबजावणी सुरू केली. हे करताना त्याने सामाजिक पायदंड पायदळी तुडवले.

जसे की लोकांची घरे उपसून जाळणे, देवघरात जाऊन देवांचा अपमान करणे, तपासणीच्या नावाखाली महिलांशी अभद्र वर्तन करणे, कर्त्या पुरुषांना नामर्दाप्रमाणे हीन वागवणे. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या साऱ्यांचा सूड घेण्याची योजना त्यांनी तयार केली.

वॉल्टर चार्ल्स रँडच्या पुण्यातील लोकांना दिलेल्या वाईट वागणुकीबद्दल या भावांनी त्याच्या वधाचा कट रचला. त्यावेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. तसेच मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते.

दामोदर चाफेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत दि. २२ जून १८९७ रोजी मध्यरात्री निवासस्थानातून बाहेर पडलेल्या रँडवर जवळून गोळ्या झाडल्या. रँड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने दि. ३ जुलै १८९७ रोजी मरण पावला.

याचवेळी दामोदराचा भाऊ बाळकृष्णाने रँड सोबत बसलेल्या लेफ्टनंट आयरिस्टवर गोळ्या झाडल्या.

सर्वसामान्यपणे चापेकर असा उल्लेख चुकीचा होत असला तरी या क्रांतिकारक बंधूंचे आडनाव चाफेकर असे होते. चापे या नावाचे गाव कोकणात नाही. या खुनाच्या घटनेनंतर चाफेकर बंधू हे आमचे नातेवाईक नाहीत, हे पटवण्यासाठी अनेक चाफेकरांनी आपले आडनाव चापेकर आहे, असे सांगावयास सुरुवात केली.

त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरून गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभि द्रविड बंधूनी- रामचंद्र व गणेश शंकर द्रविड यांनी या कटाची बातमी केवळ आर्थिक २०,०००रु . च्या लाभपोटी सरकारला दिली.

नंतर वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंना ठार केले. तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदराला मुंबईत अटक झाली व दि. १८ एप्रिल १८९८ रोजी त्यास येरवडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला दि. ८ मे १८९९ व बाळकृष्णाला दि. १६ मे १८९९ रोजी फासावर चढवण्यात आले. अशा प्रकारे तीनही चाफेकर बंधू देशासाठी शहीद झाले.

दामोदर चाफेकर यांनी आत्मचरित्र लिहिले होते, ते पोलिसांनी त्यांच्या ताब्यात ठेवले होते. पुढे हुतात्मा दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त या नावाने विठ्ठल गोपाळ खोबरेकर यांनी संपादित करून ते प्रकाशित केले. पुण्यानजीक असलेल्या चिंचवड गावाजवळच्या चौकाला चाफेकर चौक म्हणतात.

या चौकात मध्यभागी एका टॉवरमध्ये दामोदर चापेकर यांचा सन १९७१मध्ये उभारलेला पुतळा होता. मात्र तो पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या व उड्डाणपुलाच्या कामाच्या कारणाने सन २०१० मध्ये हलविण्यात आला. त्यानंतर चौकातच चापेकर बंधूंच्या समूह शिल्पाचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र हे काम या ना त्या कारणावरून सतत रखडत होते.

क्रांतिकारकांचे पुतळे तीन ते साडेतीन फुटांचे आणि त्यांखाली एक छोटा चौथरा अशा पद्धतीने काम चालू होते. परंतु क्रांतिवीर चाफेकर स्मारक समितीचे गिरीश प्रभुणे, बाळकृष्ण पुराणिक आदींनी या प्रकल्पातील त्रुटी निदर्शनास आणल्या. त्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी चालू काम थांबवून नव्याने आराखडा करण्यास सांगितले.

नव्या आराखड्यानुसार या चाफेकर चौकात दि.१० जुलै २०१६ रोजी दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर यांचे १२ फूट उंचीचे उभे आणि वसुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांचे बसलेले सात फूट उंचीचे पुतळे उभारण्यात आले आहेत. क्रांतिकारक चाफेकर बंधूंना त्यांच्या हौतात्म्य निमित्त मानाचा मुजरा!!

■ ■ ■




जंक फूडच्या अतिसेवनामुळे लठ्ठपणा, वजन वाढ, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांच्या सारख्या समस्या उद्भवतात. त्या दूर करण्यासाठी वजन कमी करणे फायदेशीर ठरते. जेव्हा वजन कमी करण्यासाठी डाएटिंग सुरू करतो, तेव्हा प्रथम आहारात निरोगी गोष्टींचा समावेश करतो, ज्यामध्ये फळांना सर्वात आरोग्यदायी पर्याय मानतो आणि ते दररोज खाण्यास सुरुवात करतो.

फळे केवळ पोषक तत्वांनी समृद्ध नसतात, तर त्यामध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात जे शरीरासाठी फायदेशीर असतात. पण सर्व फळे वजन कमी करण्यास उपयुक्त नसतात. काही फळांमध्ये इतके नैसर्गिक साखर आणि कॅलरीज असतात ते वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत अडथळा ठरू शकतात.

**केळी :** केळीमध्ये साखर आणि कॅलरीज जास्त प्रमाणात असतात. एका केळीमध्ये सुमारे १००-१२० कॅलरीज आणि उच्च काबोर्हायड्रेट्स असतात. यामुळे डाएटिंग करताना तुमचे कॅलरीज बॅलन्स बिघडू शकते. विशेषतः जर तुम्ही कमी कार्बयुक्त आहार घेत असाल तर.

**द्राक्ष :** द्राक्षे चवीला गोड असतात, पण त्यात भरपूर नैसर्गिक साखर असते. जर जास्त प्रमाणात खाल्ले तर वजन कमी होण्याऐवजी वाढू शकते. तसेच, ते लवकर पचतात, ज्यामुळे तुम्हाला लवकर भूक लागते आणि तुम्ही जास्त खाऊ शकता.

**टरबूज :** टरबूजमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते, परंतु टरबूजमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स देखील जास्त असतो. याचा अर्थ ते लवकर साखरेत रूपांतरित होते आणि त्यामुळे इन्सुलिनमध्ये वाढ होऊ शकते, ज्यामुळे वजन कमी होण्यास अडथळा येतो.

**आंबा :** उन्हाळी फळे सामान्य आहार घेणाऱ्यांसाठी नाहीत. त्यात भरपूर नैसर्गिक साखर आणि कॅलरीज असतात. विशेषतः पिकलेले आंबे वजन कमी करण्याचा प्रवास मंदावू शकतात. म्हणून, शक्य असल्यास, हे देखील टाळा.

**अननस :** अननसात फ्रुक्टोजचे प्रमाणही जास्त असते. जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर ते मर्यादित प्रमाणात खा. जास्त प्रमाणात सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

**वजन कमी करताना**
**या फळांचे सेवन करा....**

डाएट करताना सर्व फळे टाळणे आवश्यक नाही, तर तुम्हाला फळे हुशारीने निवडून खावी लागतील. आहार घेत असताना तुम्ही सफरचंद, पपई, पेरू, बेरी आणि जांभूळ अशी फळे खाऊ शकता. यामध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते, जे वजन कमी करण्यास मदत करते.

■ ■ ■

## नदी प्रदूषण - एक गंभीर समस्या

**वाचक लिहितात**

भारतात अनेक नद्या आहेत. नद्या आपली जीवनदायिनी आहे. प्राचीन काळी नद्यांच्या काठानेच मनुष्याने वस्ती वसवली. मनुष्य, प्राणी, पक्षी यांचे जीवन या नद्यांच्या जलावर अवलंबून आहे. पण भारतात पवित्र मानल्या जाणाऱ्या ह्या नद्या आज प्रदूषित झाल्या आहेत आणि याला मनुष्यच कारणीभूत आहे.

जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे. मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी, कचरा नदीत सोडल्या जाते. तसेच घरगुती कचरा, प्लास्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात, त्यातील डिटर्जंट ने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो.

प्रदूषित गढूळ पाणी पिल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचा विकार, श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. तर प्राणी सुद्धा याला बळी पडतात. पाण्यात रसायने जमा झाल्याने शेवाळाची वाढ होत, त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजन कमी होतं. त्याचा गंभीर परिणाम जलचरांवर होतो. ज्या पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाही त्या प्रती आपली उदासीनता नव्हे कृतघ्नपणा यावरून दिसून येतो.

यावर उपाय म्हणून कारखान्यांच्या सांडपाण्यातील विषारी घटक कमी करणे, पर्यावरण पूरक उत्पादने वापरणे, कीटकनाशकांऐवजी जैविक खते वापरणे. यामुळे काही प्रमाणात का होईना प्रदूषण कमी होईल. तसेच पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन आपणही ईश्वराने दिलेल्या या अनमोल देणगीप्रति कृतज्ञ राहायला हवे !

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## दमछाक..!

टप टप टपके
घामाच्या धारा
अट्ठेचाळीस कडे
गेला उन्हाचा पारा ..

सुर्यदेवा एवढी
ओकु नका आग
दुनिया जळून
होईल ना खाक ..

पराधिन जगती
पुत्र मानवाचा
पंचमहाभुतांनो
प्रश्न आमच्या
अस्तित्वाचा ..




## अहिंसेचा उपासक

**जगभर हिंसाचाराने थैमान घातलेलं असताना समस्त मानवजातीला उपकारक ठरेल असा शांततेचा आणि अहिंसेचा मंत्र देणाऱ्या गौतम बुद्धाची विचारधारा नव्याने अभ्यासण्याची आज गरज आहे. बुद्धपौर्णिमेचं औचित्य साधत प्रत्येकाने हा प्रयत्न करायला हवा. जवळपास अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान गौतम बुद्धांनी मांडलेले विचार आजच्या काळातही तर्कसंगत ठरणारे आहेत जे प्रत्येकाने आत्मसात करावेत.**

हिंसा, अशांतता, अस्थिरता, सुखलोलुपता आदींचं प्राबल्य वाढत असण्याच्या या काळात शांततेचा संदेश देणाऱ्या महात्म्याचा आठवही समजूत आणि शहाणपणाचा सांगावा देणारा ठरतो. म्हणूनच अशा औचित्यपूर्ण दिनांची पर्वणी साधत अहिंसा, शांतता, समाधानाचा मंत्र नव्याने जपण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. बुद्धपौर्णिमेच्या निमित्ताने ही सुवर्णसंधी साधता येणार असून गौतम बुद्धाच्या विचारांची उजळणी केल्यास मोठं विचारधन हाती लाभेल यात शंका नाही.

सध्याचा फोफावता हिंसाचार दाहक, भेदक आणि कमालीचा उग्र असून हिंसक विचारांच्या जाळ्यात सर्वसामान्यांनी सहजतेनं अडकत जाणं, या उग्र आणि विघातक विचारांकडे खेचलं जाणं, हिंसेचा मार्ग अवलंबणं हे सर्वच चिंताजनक आहे. जगभर विघातक प्रवृत्ती हात-पाय पसरत असून त्यांना सर्वतोपरी मदत करणारेही सहज उपलब्ध होणं ही चिंतेत भर घालणारी बाब आहे. याउलट शांततामय मार्गाने प्रश्न सोडवू पाहणाऱ्याचं प्रमाण घटताना दिसत आहे. निरिच्छ भावनेने, निष्काम हेतूने समाजाचं भलं करण्यासाठी पुढे येणारी माणसं हाताच्या बोटावर मोजता येतील इतकी अल्प आहेत. बुद्धपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर या विरोधाभासाकडे लक्ष वेधायला हवं. १९७४ मध्ये भारताने अणुचाचणी केली आणि ती यशस्वी झाल्याची खूण म्हणून तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'आणि बुद्ध हसला' असा संदेश दिला. भारताने नेहमीच शांततेची कास धरली आहे. पण ही शांतता दुबळेपणाचं प्रतीक व्हायला नको म्हणूनच आपण अणुचाचण्या केल्या



आणि चाचणी यशस्वी झाल्यानंतर 'आणि बुद्ध हसला' हा सांकेतिक संदेश दिला. संकेतात बुद्धाचा नामनिर्देश करण्याचं कारण म्हणजे मानवतेच्या इतिहासामध्ये भगवान गौतम बुद्ध हे नाव नेहमीच शांतता आणि अहिंसेशी जोडलं गेले आहे. गौतम बुद्धांनी दिलेला शांतीचा संदेश आजही म्हणजे २५ शतकं संपल्यानंतरही उचित वाटावा असाच आहे. गौतम बुद्धांचे विचार कालातीत आहेत.

मानवी जीवनामध्ये सतत सुख आणि दु:ख यांचा लपंडाव सुरू असतो. सुखाच्या आणि दु:खाच्या प्रसंगांमुळे मानवी मनाची मशागत होत असते. मात्र तत्त्वज्ञान सुखापेक्षा दु:खातून अधिक प्रभावीपणे निर्माण होतं. किंबहुना, जगातल्या सर्व तत्त्वज्ञानाच्या मुळाशी दु:खच आधारभूत राहिलेलं आहे. सुखाच्या संवेदना माणसाला परमेश्वराची आठवण करून देत नाहीत मात्र माणूस दु:खामध्ये अंतर्मुख होतो आणि जीवनाकडे तात्त्विक दृष्टीने पहायला लागतो. त्यातूनच नवं तंत्र, नवं तत्त्वज्ञान, धर्म आणि पंथ निर्माण झाले आहेत. भगवान गौतम बुद्धांनी वयाच्या २९ व्या वर्षी गृहत्याग केला. यामागेही दु:ख हेच कारण होतं. त्या दु:खाची कारणं शोधत-शोधत बुद्धांनी पायी प्रदीर्घ वाटचाल केली, ही कथा सर्वांना माहीत आहे. सहा वर्षं परिभ्रमण केल्यानंतर त्यांना बौद्धगयेतील पिंपळाच्या झाडाखाली साक्षात्कार झाला आणि आशा हे सर्व दु:खाचं मूळ असल्याचं ज्ञान प्राप्त झालं. तसं पाहिलं तर भगवान गौतम बुद्धांनी स्थापन केलेला बौद्धधर्म काही वर्षं उपेक्षित राहिला होता; परंतु गौतम बुद्धाच्या निर्वाणानंतर ७०० वर्षांनी सम्राट अशोकांनी या धर्माचा स्वीकार केला. सम्राट अशोकाच्या राजाश्रयामुळे बौद्धधर्म जगभर फोफावला.


भक्ती विशेष

त्या काळामध्ये हिंदुंनी बौद्ध धर्म स्वीकारणं ही सामान्य घटना समजली जात असे. अनेक हिंदू बौद्धधर्म स्वीकारत आणि अनेक बौद्ध नंतर हिंदू धर्मात परत येत असत. बौद्ध धर्मातून हिंदू धर्मात आणि हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात होणारी ही आवक-जावक मोठ्या प्रमाणावर सुरू होती. त्यामुळे बौद्धधर्माचा हिंदू जीवनपद्धतीवर मोठा पगडा आहे. सम्राट अशोकांच्या प्रोत्साहनामुळे बौद्धांनी भारतवर्षामध्ये चांगलाच जोर धरला. भारताबरोबरच चीन, जपान, इंडोनेशिया, मलेशिया आदी आशियाई देशांमध्ये या धर्माचा प्रसार झाला. ५४ वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हजारो अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्मात प्रवेश केला. त्यामुळे बौद्धधर्माचा प्रभाव थोडा वाढला. बौद्धधर्माच्या प्रभावामध्ये असे चढ-उतार झाले असले तरी भगवान गौतम बुद्धाने मांडलेलं तत्त्वज्ञान जगातील अनेक धर्मांनी स्वागतार्ह मानलं आहे.

एकूणच भारतीय जीवनपद्धतीवर बौद्ध विचारांची अमीट छाप आहे. सम्राट अशोकाच्या काळामध्ये बौद्धधर्म स्वीकारणाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांची संख्या मोठी होती. बुद्धांच्या विचारांमध्ये अहिंसेला परमस्थान होतं. त्यामुळे त्या काळच्या शेतकरी जीवनामध्ये अहिंसेचा विचार एक जीवनपद्धती म्हणून स्वीकारला गेला होता. त्यातूनच गायीची हत्या करण्याचा निषेध उदयाला आला असावा, असा तर्क आहे. आज संपूर्ण जग हिंसेच्या खाईत लोटलं जाऊ लागलं आहे. किंबहुना, दहशतवाद आणि हिंसाचार हा आजच्या मानवी जीवनाचा स्थायीभाव होऊ पहात आहे. या अध:पातापासून मानवी जातीची सुटका करायची असेल तर भगवान गौतम बुद्धांचा अडीच सहस्त्रकापूर्वी मांडलेला अहिंसेचा शाश्वत विचारच उपयुक्त ठरणार आहे.

गौतम बुद्धांनी दिलेल्या शिकवणुकीतील अनासक्त जीवन जगण्याचा उपदेशही आजच्या मानवतेला उपयुक्त ठरणारा आहे. आज संपूर्ण मानवजात उपभोगवादाच्या गर्तेत सापडली आहे आणि या उपभागवादातूनच मानवी जीवनासमोरील अनेक प्रश्न गंभीर झाले आहेत. देशा-देशातील तणाव, वाढतं शस्त्रसामर्थ्य, युद्ध आणि संघर्ष हे सर्व मानवी जीवनाच्या उद्दिष्टांशी विसंगत आहे. बुद्धविचारांची कास धरल्यास ही विसंगती दूर होईल आणि माणसातील संवेदनशील मन जागृत राहील अशी आशा वाटते.

## मनगटावर धागा कशासाठी?



हिंदू धर्मात हातावर धागा बांधण्याला बरंच महत्त्व आहे. मंदिरात गेल्यावर किंवा इतर धार्मिक कार्यात मनगटावर धागा बांधून घेणं शुभ मानलं जातं. मनगटावर धागा बांधण्यामागे धार्मिक कारणं आहेतच शिवाय या कृतीचं वैज्ञानिक महत्त्वही आहे. याविषयी जाणून घेऊ या...

जाणून घ्या

* मनगटावर धागा बांधल्याने ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिदेवांची कृपा प्राप्त होते. यामुळे जीवनातली संकटं दूर होतात, असं मानलं जातं.

* हा धागा कच्च्या सूतापासून तयार केला जातो. लाल, पिवळ्या, केशरी अशा विविध रंगांमध्ये तो उपलब्ध असतो. यामुळे शरीरात सकारात्मक ऊर्जेचा संचार राहतो.

* मनगटावर बांधल्या जाणाऱ्या धाग्यामुळे शरीरातला रक्तप्रवाह सुधारतो. यामुळे रक्तवाहिन्यांवर दाब पडतो आणि शरीरातल्या विविध भागांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते.

* मनगटावर बांधलेल्या धाग्यामुळे रक्तवाहिन्या तंदुरूस्त राहतात आणि उच्च रक्तदाब, मधुमेहासारख्या विकारांपासून बचाव होतो.

## कशाला उद्याची बात?

सध्या प्रत्येकावरच प्रचंड ताण असतो. प्रत्येकाला पुढे जायचंय. अशा परिस्थितीत ताणात भर घालण्याची काहीही गरज नाही. जीवनातल्या काही गोष्टींचा आपण नाहक ताण घेत असतो. या गोष्टींचा आपल्या आयुष्याशी तीळमात्र संबंध नसतो. या बाबींकडे दुर्लक्ष करूनच आपण पुढे जायला हवं.

* इतर लोक आपल्याबद्दल काय विचार करतात, याचा आपण नाहक ताण घेतो. या विचारांच्या पिंजऱ्यात आपण नाहक बंदिस्त होतो. इतर लोक आपल्याबद्दल काय विचार करतात यापेक्षा आपल्याला स्वत:बद्दल काय वाटतं हे महत्त्वाचं आहे. आपला आत्मविश्वास, स्वत:विषयी वाटणारं प्रेम महत्त्वाचं असतं. आपल्या अडचणी कोणीही दूर करू शकत नाही. त्यामुळे आधी स्वत:वर प्रेम करायला शिका. स्वत:वरच्या प्रेमाचं रोपटं रूजवलं की इतरांच्या बोलण्याचा फार परिणाम होत नाही.

* ज्यांना तुम्ही आवडत नाही ते लोक तुमच्या आयुष्यातून बाहेर पडायला मोकळे असतात. पण तुम्ही स्वत:पासून दूर जाऊ शकत नाही. त्यामुळे स्वत:ची काळजी घ्यायला शिका.

* पैसा आनंद आणू शकत नाही. त्यामुळे बँक बॅलन्सकडे पाहून निराश होऊ नका. फार ताण घेऊ नका. वर्तमानात जगा. आज आपल्याकडे काय आहे याचा विचार करा. समाधान माना. छोट्या छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवण्याचा



प्रयत्न करा.

सेल्फ हेल्प

* भूतकाळात घडलेल्या चुकांबद्दल स्वत:ला दोष देत बसू नका. यामुळे भूतकाळ बदलणार नाही हे लक्षात घ्या. प्रत्येक चुकीतून तुम्ही शिकू शकता ही बाब ध्यानात ठेवा. चुकांनी तुम्हाला पुढे जाण्याची संधी दिलेली असते ही बाब दृष्टीआड करू नका. चुकांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघा.

* लोक काय करतात याचा विचार करू नका. गर्दीचा भाग बनू नका. भपकेबाजीच्या नादात वाहवत जाऊ नका. तुम्हाला काय हवंय, या जगात तुम्ही कशाला आला आहात याचा विचार करा. तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करा.

* आपण जाड आहोत की बारीक; काळे आहोत की गोरे याचा ताण घेऊ नका. या जगात कोणीही सुयोग्य नसतं. प्रत्येकाची शरीर रचना वेगळी असते. तुम्ही आहात तसंच स्वत:ला स्वीकारा. शरीरस्वाथ्यासाठी व्यायाम करा. तंदुरूस्ती राखा. लोकांना हवंय तसं बनण्याचा प्रयत्न करू नका.

* प्रत्येकाला खूश करण्याचा प्रयत्न करु नका. लोकांना खूश केल्यामुळे तुमच्याभोवती नाचणाऱ्यांची संख्या वाढेल. पण हे खूशमस्करे असतील हे ध्यानात घ्या. इतरांना खूश करण्याऐवजी स्वत:चा विचार करा.

* तुम्हाला दुखावलेली व्यक्ती आयुष्यातून निघून गेली तर वाईट वाटून घेऊ नका. आपल्या आयुष्यात लोक येतात आणि निघून जातात. याचा फार ताण घेऊ नका.

## इथे मिळतो शाप!

मंदिर हे श्रद्धा आणि आस्थेचं स्थान मानलं जातं. मंदिरात गेल्यावर भक्तांना समाधान लाभतं. परमेश्वराची पूजा केल्यावर मनोकामना पूर्ण होते हा विश्वास भाविकांच्या मनात असतो. पूजा केल्याने भगवंत प्रसन्न होतो. पण पूजा केल्यानंतर देव शाप देत असेल तर? उत्तराखंडमधल्या पिथौरागडमधल्या बल्तिर नावाच्या गावात भगवान शिवाचं एक मंदिर आहे. या मंदिरातल्या शंकराच्या पिंडीची पूजा कधीच झालेली नाही. या मंदिरात पूजा केल्यास देव शाप देतो, अशी भीती भाविकांमध्ये आहे. हथिया देवाल या नावाने हे मंदिर ओळखलं जातं. हथिया देवाल देवस्थान स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. या मंदिरात भाविक येतात, शिवाचं दर्शन करतात आणि निघून जातात. पूजेचे सोपस्कार पार पाडले जात नाहीत.

तीर्थक्षेत्र

या मंदिरात शंकराची पूजा का होत नाही याबाबत एक कथा सांगितली जाते. एकेकाळी या ठिकाणी राजा कत्युरी याची सत्ता होती. हा राजा स्थापत्य कलेचा चाहता होता. एके दिवशी राजाने मंदिर उभारायचं ठरवलं. कुशल कारागिराने मंदिराची निर्मिती करायला सुरूवात केली. या कारागिराला एक हात नव्हता. मंदिर उभारत असताना लोक त्याची मस्करी करायचे. यामुळे कारागीर वैतागायचा पण त्याने मंदिर उभारण्याचा प्रयत्न सोडला नाही. भलामोठा दगड त्याने एका रात्रीत कापून काढला आणि मंदिराची उभारणी केली. या मंदिरात शिवलिंगही घडवण्यात आलं पण या शिवलिंगाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली नाही.



त्यामुळे त्याची पूजा करण्यात आली नाही. कालौघात ही परंपरा बनून गेली. या मंदिरात पूजा केल्यास भगवान शंकर शाप देतात असा समज पसरला. यामुळे इथे कोणीही पूजा करत नाही.

## घरात कोणती चित्रं नसावी?

घर सजवायला कोणाला आवडत नाही? महागड्या फर्निचरसोबत घरात छानशी चित्रं लावली जातात. वेगवेगळ्या चित्रांनी भिंती सजवल्या जातात. आपल्या आसपासची प्रत्येक वस्तू आणि व्यक्ती ब्रह्मांडातल्या शक्तींना आकर्षित करत असते. आपल्या आसपास नकारात्मक ऊर्जा असेल तर विपरित परिस्थितीचा सामना करावा लागतो. म्हणूनच सकारात्मक विचार असणाऱ्या व्यक्ती आणि सकारात्मकता निर्माण करणाऱ्या वस्तूंना जवळ करणं गरजेचं ठरतं. वास्तूशास्त्राच्या दृष्टीने ठराविक प्रकारची चित्रं अयोग्य मानली जातात. अनावधानाने किंवा पुरेशा माहितीअभावी अशी चित्रं आपण घरात लावतो आणि नकारात्मक ऊर्जेला आकर्षित करतो. घरात कोणती चित्रं लावणं योग्य ठरत नाही, याविषयी जाणून घेऊ या...



* नृत्यकलेत निपुण असणारे अनेक जण घरात नटराजाची मूर्ती ठेवतात. नटराजाचं चित्रं आणि फोटोही त्यांच्या घरात असतो. पण प्रत्यक्षात नटराजाचं नृत्य हे संहाराचं प्रतीक मानलं जातं. त्यामुळे नटराजाचं चित्र किंवा मूर्ती घरात ठेवणं अशुभ मानलं जातं.

वास्तू

* घरात किंवा कार्यालयात बुडणाऱ्या जहाजाचं चित्र लावू नये. अशा प्रकारच्या चित्रांमुळे नकारात्मक तरंग उमटू लागतात आणि सकारात्मक ऊर्जा तुमच्यापासून दूर जाते. अशा चित्रांमुळे भाग्योदय होत नाही.

* वाहत्या पाण्याचं चित्र किंवा कृत्रीम धबधबा घरात ठेऊ नये. वाहतं पाणी अस्थिरतेचं प्रतीक समजलं जातं. वाहतं पाणी, धबधबा किंवा नदीचं चित्र घरात असेल तर संपत्ती आणि प्रगतीवर परिणाम होऊ शकतो. अशा चित्रांमुळे पैसा हाती रहात नाही. खर्च वाढतात आणि बचत होत नाही.

* घरात हिंस्त्र प्राण्यांची चित्र लावू नये. यामुळे घरात कलह संभवतो. पती-पत्नीच्या नात्यात दुरावा येऊ शकतो. नाहक वाद होतात.

* ताजमहाल हे प्रेमाचं प्रतीक मानलं जातं. अनेकांच्या घरात ताजमहालाचं चित्र असतं. पण ताजमहाल ही मुमताजची कबर आहे हे आपण विसरतो. घरात कबरीचं चित्र असू नये. यामुळे मृत्यू किंवा विनाश संभवतो.

* घरात महाभारतातील प्रसंगांची चित्रं लावू नयेत. महाभारत हे महाकाव्य असलं तरी यात एकमेकांविरूद्धचा द्वेष, राग, लोभ दिसून येतो. अशा चित्रांमुळे ताण, नैराश्य, दु:ख अशा भावना वाढीस लागतात. तसंच घरात कलह संभवतो.

* घरात दु:खी, कष्टी लोकांची चित्रं लावू नयेत. अशी चित्र अशुभ असतात.

* युद्ध, हिंसा दाखवणारी चित्र घरात नसावी. ही चित्रं नकारात्मक ऊर्जा घेऊन येतात. यामुळे माणसं दुरावतात.

## 'यांच्यावर' नका ठेऊ विश्वास

आदिशक्तीवर आधारित अनेक पौराणिक ग्रंथ आहेत. त्यात देवी भागवत महापुराणाचं महत्त्व वादातीत आहे. या ग्रंथात देवीच्या प्रत्येक अवताराबद्दल आणि तिने केलेल्या चमत्काराबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आपण काही माणसांवर अंधविश्वास ठेवतो. पण याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतात. देवी भागवतात अशा लोकांचं वर्णन करण्यात आलं आहे. या स्वभावाची माणसं दु:ख वाढवण्यास कारणीभूत ठरू शकतात.



* इतरांना दु:खी किंवा कष्टी झाल्याचं बघून आनंदी होणारे लोक दुष्ट मानले जातात. अशी माणसं इतरांना त्रास देतात. इतरांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतात.

* परस्त्रीवर वाईट नजर ठेवणारा मनुष्य दुष्ट असतो. अशा माणसाच्या मनात चुकीच्या भावना उत्पन्न होतात. आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी असा मनुष्य कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशा लोकांवर विश्वास ठेऊ नये.

धर्मग्रंथातून

* लोभी माणसावर विश्वास ठेऊ नये. असे लोक स्वत:च्या फायद्यासाठी काहीही करू शकतात. कोणालाही अडचणीत आणू शकतात. असे लोक फक्त स्वत:चा फायदा बघतात.

* इतरांबाबत मनात ईर्ष्या असणारी माणसं विश्वासाला पात्र नसतात. अशा लोकांवर कधीही विश्वास ठेऊ नये. अशी माणसं कोणाचंही भलं करू शकत नाही. इतरांबाबत ती वाईट विचार करतात. त्यामुळे अशा लोकांपासून चार हात लांबच रहायला हवं.

* धर्मावर आणि देवावर विश्वास नसणारा माणूस धर्माचरण करत नाही. अशा माणसांना देवाची भीती नसते. हे लोक कसेही वागू शकतात. त्यामुळे त्यांच्यावर फार विश्वास ठेवू नये.

* कपटी मनुष्य आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी कोणत्याही थराला जातो. अशा लोकांच्या मनात कोणाबद्दल आपुलकी आणि प्रेमाची भावना नसते. त्यांच्या मनात कायमच स्वार्थी भाव असतो. स्वत:चा विचार केला जातो. त्यामुळे अशा लोकांना लांबच ठेवलं पाहिजे.

* अहंकारी माणूस चांगल्या आणि वाईटाचा विचार करत नाही. असे लोक स्वत:ला सर्वोत्तम समजतात. त्यामुळे अहंकारी माणसांवर फार विश्वास ठेवल्याने आपलं नुकसान होऊ शकतं.

## होता परमेश्वरी कृपा

या सृष्टीवर परमेश्वराची सत्ता आहे. परमेश्वरी सत्तेपुढे कुणाचं काही चालत नाही. परमेश्वर सर्वोच्च स्थानी आहे. परमेश्वराने या सृष्टीची रचना अनोख्या पद्धतीने केली आहे. प्रत्येक सजीवाच्या गरजेकडे लक्ष दिलं आहे. कोणावरही अन्याय केलेला नाही. सगळं कसं नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आहे. दररोज सकाळी सूर्य उगवतो. संध्याकाळी मावळतो. ही पृथ्वी अविरतपणे फिरत आहे. समुद्रात लाटांचा खेळ सुरु आहे. नदीला उसंत नाही. वेळेवर पाऊस पडतो. तापलेल्या धरणीला दिलासा मिळतो. जलधारांनी सगळी सृष्टी कशी चिंब होऊन जाते. परमेश्वरी कृपेशिवाय माणसाला काहीही मिळत नाही. मनुष्यजन्म नशीबाने मिळतो. या जन्मात माणूस सगळ्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी धडपडतो. पण परमेश्वराला, त्याच्या शक्तीला विसरतो. पैसे कमवायच्या धावपळीत त्याच्यापुढे काही क्षण नतमस्तक व्हायलाही त्याच्याकडे वेळ नसतो.

गतजन्मातल्या पुण्याईने मनुष्यजन्म प्राप्त होतो. माणसाला सगळ्या गोष्टींवर स्वत:चं नियंत्रण हवं असतं. प्रत्येक गोष्ट आपल्या मर्जीनुसार घडायला हवी असते. पण प्रत्यक्षात असं होत नाही. कारण या जगातल्या प्रत्येक गोष्टीवर परमेश्वरी अंमल असतो. सगळं काही त्याच्या मर्जीने घडत असतं. देवाच्या मनात असेल तरच आयुष्यात यश मिळतं. आयुष्यात



यश मिळवण्यासाठी दोन नियमांचं पालन करायला हवं. आपल्या प्रयत्नांमध्ये कधीही कसूर करू नये. तसंच परमेश्वरी कृपा प्राप्त करण्यासाठी कायम प्रयत्नशील असलं पाहिजे. या जगातला प्रत्येक मनुष्य आयुष्याची लढाई लढतोय. जीवनात संघर्ष करतोय. पण क्षमता असूनही प्रत्येकाच्या पदरी यश पडत नाही. याचं कारण म्हणजे परमेश्वरी कृपेचा अभाव. परमेश्वराची कृपा झाली की अशक्य गोष्टही साध्य होतात. आयुष्यात सगळी सुखं प्राप्त होतात. यश मिळतं.

बोध

माणसाच्या हातात काहीही नसतं. मनुष्य स्वत:ला सर्वसत्ताधीश समजत असला तरी प्रत्यक्षात सगळं काही त्या विधात्याच्या हातात आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत सगळं काही परमेश्वराच्या हाती असतं. म्हणूनच सगळं काही असूनही माणूस कधीही सुखी नसतो. देवाच्या कृपेशिवाय माणूस आयुष्यात पुढे जाऊ शकत नाही. भरारी घेऊ शकत नाही. जीवनात मिळालेली प्रत्येक गोष्ट ही देवाची कृपा समजली पाहिजे. मानमरातब, पैसा, संपत्ती, पद हे सगळं क्षणभंगूर आहे. परमेश्वर एका क्षणात तुम्हाला खाली खेचू शकतो. राजाचा रंक करू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने देवाची करूणा भाकली पाहिजे. अहंभाव ठेऊ नये. आपणच सर्वज्ञ अशा आविर्भावात वावरू नये. देवाची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्नशील असावं.

# भाजपची विदर्भात नवी संघटना बांधणी

## माजी महापौर दयाशंकर तिवारी नागपूर शहराध्यक्ष



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

विधानसभेत दणदणीत विजय मिळवणाऱ्या भाजपाने आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी संघटन बांधणी केली आहे. विदर्भातील दोन अध्यक्ष वगळता सर्वांना बदलवले आहे. खामगाव व अकोल्यातील अध्यक्षांना कायम ठेवण्यात आले तर, चंद्रपूर शहर व ग्रामीण, गडचिरोली आणि वर्धेचा तिढा सुटला नाही. या सर्व नवनियुक्त अध्यक्षांचा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कस लागणार आहे. या निवडणुकीतील कामगिरीवर पुढे मूल्यमापन होईल.

नागपुरात माजी महापौर दयाशंकर तिवारी यांना शहराध्यक्ष करण्यात आले आहे. बंटी कुकडे व बाल्या बोरकर हे आलटुन पालटुन शहराध्यक्ष होत होते. यावेळेस तिवारी यांचे नाव चर्चेत नसताना धक्कातंत्र देत जाहीर करण्यात आले. स्वयंसेवक असलेले तिवारी हिंदुत्ववादी चेहरा आहे.

भाजपने मंडळांची संख्या वाढवली तसेच, नागपूर व अमरावती ग्रामीण शिवसेनेप्रमाणे दोन अध्यक्ष दिले. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत ७८ अध्यक्ष आहेत. विदर्भात १७ होते आता १९ झाले आहेत. यावेळी काटोल आणि मेळघाट अशा दोन अध्यक्षांची भर पडली. प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी मंगळवारी ५८ अध्यक्षांची घोषणा केली, २२ अद्याप प्रलंबित आहेत. पक्षाने विदर्भात समतोल साधण्याचा प्रयत्न केला. सामाजिक समीकरण लक्षात घेतले आणि महिलांना देखील संधी दिली.

अनुसूचित जाती, जमाती आणि महिलांचा विचार करण्यात आला. महापालिका, जिल्हा परिषद व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने संघटनेची रचना केली जात आहे. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या जागेवर कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे नाव निश्चित झाले आहे. अध्यक्षपदासाठी ४५ ते ६० वयोगट आणि आमदार नको, असे पक्षाचे धोरण होते. अध्यक्ष व आमदार एकच राहिल्यास दोन्ही पदांना न्याय दिला जात नाही, म्हणून भाजपाने या वेळेस निकष बदलवले.

नागपूर शहर - दयाशंकर तिवारी
ग्रामीण रामटेक -आनंदराव राऊत
काटोल - मनोहर कुंभारे
बुलढाणा -विजयराज शिंदे
अकोला ग्रामीण - संतोष शिवरकर
वाशीम - पुरुषोत्तम चितलांगे
अमरावती - शहर नितीन धांडे
ग्रामीण - रविराज देशमुख
यवतमाळ - प्रफुल्ल चव्हाण
पुसद - डॉ. आरती फुफाटे
मेळघाट - प्रभूदास भिलावेकर
भंडारा - आशु गोंडाने
गोंदिया - सीता रहांगडाले

# दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रीकरणाच्या चर्चा केवळ मिडियातच

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांना शरद पवार यांच्या वक्तव्यानंतर वेग आला असतानाच, माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी या चर्चांवर स्पष्टीकरण दिले आहे. सध्या अशा कोणत्याही चर्चा पक्षाच्या पातळीवर सुरू नाहीत, या चर्चा फक्त मिडियात आहेत, असे स्पष्ट करत त्यांनी राजकीय गोंधळावर काहीसा पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

यापूर्वी शरद पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र आले, तर आश्चर्य वाटू नये असे विधान केले होते. यामुळे एकत्रीकरणाच्या शक्यतेवर राजकीय चर्चा तापल्या होत्या. मात्र, अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, प्रत्यक्षात राजकीय पातळीवर कोणतीही चर्चा सुरू झालेली नाही. देशमुख म्हणाले की, सुप्रिया सुळे आमच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेतच, त्या खासदार देखील आहेत. त्या वरिष्ठ नेत्या आहेत. त्यामुळे काही प्रश्नच नाही. दरम्यान, दोन्ही गट एकत्र येण्यासंदर्भात सध्या कुठलीही चर्चा नाही.

दुसरीकडे, आमदार अमोल मिटकरी यांनी यावर भाष्य केले आहे. केंद्रात सुप्रिया सुळे यांना कॅबिनेटमंत्रिपद सुद्धा मिळण्याची शक्यता आहे. म्हणून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्यास कार्यकर्ता म्हणून स्वागत करतो. एकत्र आलेल्या राष्ट्रवादीमध्ये अजित पवारांचे नेतृत्व मान्य करून पुढची वाटचाल करायला हरकत नसल्याचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी सांगितले आहे.



■ **नागपूर:** *वन्यप्राणी आणि विशेषकरुन वाघ पाहायचा असेल तर उन्हाळ्याचा ऋतू सर्वात चांगला. हल्ली सर्वच अभयारण्यात पर्यटकांना व्याघ्रदर्शन होत आहे आणि त्यामुळेच पर्यटकांचा जंगलाकडे येण्याचा ओघही वाढत आहे. या कालावधीत पाणवठ्यातील वाघ, वाघीण किंवा त्यांचे कुटुंब पर्यटकांना कधीच निराश करत नाहीत. पेंच व्याघ्रप्रकल्पात खुर्सापार गेटजवळ बी-२ वाघीण आणि तिच्या बछड्यांचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल होत आहे. सब्बर पाशा यांनी हा व्हिडीओ चित्रित केला आहे. पेंच व्याघ्रप्रकल्पात बी-२ म्हणजेच ज्या वाघिणीला कॉलरवाली म्हणूनही ओळखले जाते. ही वाघीण तिच्या बछड्यांसह कृत्रिम पाणवठ्यामध्ये मनसोक्त डुंबण्याचा आनदं घेत आहे.*

# चिकनगुनियाचे रुग्ण वाढले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

राज्यात मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा चिकनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. सर्वाधिक रुग्ण बृहन्मुंबई, पुणे, अकोला जिल्हा व महापालिका भागात नोंदवले गेले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.

राज्यात १ जानेवारी २०२४ ते ७ मे २०२४ दरम्यान चिकनगुनियाचे ६०७ रुग्ण नोंदवण्यात आले होते. परंतु, यंदा १ जानेवारी २०२५ ते ७ मे २०२५ दरम्यान सारख्याच कालावधीत चिकनगुनियाचे ७१८ रुग्ण नोंदवले गेले. जिल्हानिहाय बघितल्यास पुणे, अकोला, सिंधुदुर्ग, पालघर भागात तर महापालिकानिहाय बघितल्यास बृहन्मुंबई, अकोला, सांगली, मिरज भागात सर्वाधिक रुग्ण आढळले आहे. मागील दोन वर्षात या आजाराने एकही मृत्यू झाला नाही.

चिकनगुनिया हा एक विषाणू आहे जो लोकांमध्ये डासांच्या चाव्याव्दारे पसरतो – विशेषतः एडिस इजिप्ती डास आणि एडिस अल्बोपिक्टस डासांच्या माध्यमातून. जेव्हा विषाणू असलेला डास एखाद्या व्यक्तीला चावतो तेव्हा चिकनगुनियाचा संसर्ग होतो.

चिकनगुनिया हा चिकुनगुनिया विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य रोग आहे, जो प्रामुख्याने डासांच्या चाव्याव्दारे पसरतो. हा रोग मुख्यतः त्याच्या लक्षणांद्वारे ओळखला जातो, ज्यामध्ये ताप, सांधेदुखी, डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि पुरळ यांचा समावेश होतो.

चिकनगुनिया हा एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरत नाही . परंतु डास संक्रमित व्यक्तीला चावल्यावर विषाणू उचलतात. जर तुम्हाला हा संसर्ग झाला असेल, तर विषाणू इतरांना पसरू नये म्हणून नवीन डास चावणे टाळा.

# अनैतिक संबंधाला विरोध करणाऱ्या पतीचा खून

## ७८ वर्षीय प्रियकरासोबत नको त्या अवस्थेत आढळली पत्नी

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. १४ :

शेतीचा लेखाजोखा ठेवणाऱ्या ७८ वर्षीय दिवानजीच्या प्रेमात ३२ वर्षीय महिला पडली. शेतातील घरात महिला दिवानजी सोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करताना अचानक पती घरी आला. त्याला दोघेही नको त्या अवस्थेत दिसले. त्यामुळे त्याचा पारा चढला.

त्याने पत्नीला मारहाण केली तर दिवानजीला शिवीगाळ करुन पळवून लावले. त्यानंतर मात्र, पत्नीने प्रियकराच्या मदतीने दारुड्या पतीचा गळा आवळून खून केला.

ही धक्कादायक घटना नरखेडमध्ये उघडकीस आली. शिवा ऊर्फ शिवशंकर गणुजी धुर्वे (३४, रा.नरखेड) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. तर पत्नी रुणीता धुर्वे (३२) आणि प्रियकर शांताराम पुरणसिंह दीदावत (७८, रा. बेलोना, ता. नरखेड) अशी आरोपी प्रेमीयुगुलाची नावे आहेत. प्रेमी युगुलाला नरखेड पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत

बिरोली, ता. मुलताई. जि. बैतूल-मध्यप्रदेश येथील रहिवाशी शिवशंकर हा पत्नी रुणीता व दोन मुलांसह कामाच्या शोधात नागपूरला आला होता. त्याला नरखेडमधील एका शेतकऱ्याच्या शेतीवर सालगडी म्हणून काम मिळाले.

शिवा हा शेतातील घरात कुटुंबासह राहायला लागला. पती-पत्नी शेतातील काम करीत होते. तर त्यांची दोन्ही मुले नरखेड येथील शाळेत शिकत होती. सर्व काही सुरळीत सुरु होते.

यादरम्यान पती शिवा याला दारुचे व्यसन जडले. तो रोज दारु पिऊन घरी यायला लागला. दारु पिण्याच्या सवयीमुळे घरात पती-पत्नीत वाद होत होते. शिवा काम करीत असलेल्या शेतमालकाकडे शांताराम दीदावत (७८) हा दिवानजी म्हणून काम बघत होता.



शेतीचा लेखाजोखा आणि शेतमजुरांची मजुरी देण्याचे काम शांतारामकडे होती. त्यामुळे तो नेहमी शिवाच्या घरी येत होता. यादरम्यान, रुणीताचे शेतावरील दिवानजी शांताराम दीदावत याच्याशी सूत जुळले. दारुड्या पतीला कंटाळलेल्या रुणीताने वृद्ध दिवाजीशी अनैतिक संबंध सुरु केले. दिवानजी रोज शेतातील घरी यायला लागला.

रविवारी शिवशंकर हा दारु पिण्यासाठी गावात गेला होता. शेतावर कुणी नसल्याची संधी साधून रुणीता आणि शांताराम हे दोघेही शारीरिक संबंध प्रस्थापित करीत होते. दरम्यान, तिचा पती घरी आला. दोघेही नको त्या अवस्थेत दिसले. चिडलेल्या पतीने रुणीताला मारहाण केली. तसेच शांतारामला बघून घेण्याची धमकी दिली.

त्यामुळे सोमवारी रात्री दारुच्या नशेत असलेल्या शिवशंकर याचा रुणीता आणि प्रियकर शांताराम यांनी गळा आवळून खून केला. दुसऱ्या दिवशी अप्पर अधीक्षक अनिल म्हस्के यांना हत्याकांडाबाबत संशय आला. त्यांनी कसून चौकशी केल्यानंतर हे हत्याकांड उघडकीस आले.

: लोकसेवार्थ :

# पुण्याचे 'हरित रक्षक'



लोकजागर

देशभरातील सर्वाधिक सक्रिय स्वयंसेवी संस्था असलेल्या शहरांमध्ये पुण्याचा समावेश पहिल्या पाच क्रमांकातील शहरांमध्ये होतो. सर्वाधिक निसर्गाबद्दल जागरूक आणि संवेदनशील नागरिक असलेल्या शहारांमध्येही पुणे पुढे आहे.

विचारशक्ती विरोधात लढण्याचे आव्हान या निसर्ग सेवकांनी स्वीकारले आहे. विकास प्रकल्पांमध्ये 'खो ' घालणारी मंडळी अशी टीका सातत्याने होत असताना प्रवाहाच्या विरोधात जाऊन सारंग यादवाडकर, विनोद जैन, सुजीत पटवर्धन, विवेक वेलणकर, सुनील जोशी, विनोद बोधनकर, ॲड. असीम सरोदे, प्रभाकर कुकडोलकर, राजीव पंडित असे अनेक कार्यकर्ते पर्यावरणासाठी लढत आहेत.

पर्यावरणाचा विचार झाला पाहिजे, शाश्वत विकासाचा प्राधान्य मिळावे, हा त्यांचा उद्देश आहे. शहरातील पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी विविध संस्थातर्फे राबविण्यात येत असलेल्या अभिनव उपक्रमांमुळेच नागरिकांमध्ये आजही निसर्गाप्रती काही अंश संवेदनशीलता टिकून आहे.

निसर्गाबद्दल तरुणांमध्ये असलेल्या कुतूहलाला चालना देण्यासाठी प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ किरण पुरंदरे यांनी २००४ मध्ये 'नेचरवॉक' संस्था स्थापन केली. शास्त्रज्ञ, संशोधकांच्या भाषेत नव्हे तर सर्वसामान्यांच्या भाषेत लोकांपर्यंत निसर्गाचा खजिना पोहोचविण्याचा या संस्थेचा उद्देश पुढे अनुज खरे आणि त्यांच्या टीमने संस्थेची व्याप्ती वाढवली.

गेल्या २४ वर्षांपासून संस्थेतर्फे पर्यावरणाबद्दल जागृतीसाठी असंख्य प्रकाराचे कार्यक्रम राबविण्यात आले असून, विविध क्षेत्रातील शेकडो निसर्गप्रेमी संस्थेशी जोडले गेले आहेत. संस्थेच्या स्थापनेपूर्वीपासून सुरू करण्यात आलेल्या कट्टा या उपक्रमाला आता २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी भरणारा या निसर्ग कट्टा सवासांठी विनामूल्य खुला असतो. अवघ्या पाच वर्षांच्या मुलांपासून ते ७५ वर्षांचे आजोब असे विविध वयोगटातील लोक या कट्ट्याचे सभासद झाले आहेत.

वाईल्ड इंडिया या उपक्रमातून संस्थेने मुंगीपासून हत्तीपर्यंत, दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या विविध राज्यातील जंगलांवर आधारित अनेक दुर्मिळ चित्रपट दाखविले आहेत. अनेक प्रसिद्ध वन्यजीव फोटोग्राफर संस्थेशी जोडलेले आहेत, दर काही दिवसांनी आयोजित करण्यात येणारी त्यांची छायाचित्रांचे प्रदर्शने म्हणजे पर्वणीच ठरते. तसेच दरवर्षी पक्षी विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी होणाऱ्या बर्ड फेस्टही आयोजित केले जाते.विविध क्षेत्रांतील उत्साही मंडळी निसर्गप्रेम या एका धाग्यातून तीस वर्षांपूर्वी एकत्र आली. यातूनच शशी पटवर्धन, श्रीधर केतकर, डॉ. रमेश गोडबोले यांच्या टीमने 'निसर्ग सेवक संस्थे'ची स्थापना केला. या संस्थेने शहराला 'स्मृतिवन' आणि 'स्मृतिउद्यान' हे दोन अभिनव प्रकल्प दिले.

ऱ्हास झालेल्या नैसर्गिक अधिवासांना पुनरुज्जीवत करण्याचे ध्येय निश्चित करून स्थापन करण्यात आलेली 'इकॉलॉजिकल सोसायटी' एक नामांकित संस्था. पर्यावरणाबद्दल शिक्षण, संशोधनाला प्रोत्साहन आणि जनजागृती या तीन सूत्रांचा आधार घेऊन ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ डॉ. प्रकाश गोळे यांच्या पुढाकाराने १९८२ मध्ये सोसायटीची स्थापन केला. या संस्थेतर्फे गेल्या तीन दशकांमध्ये पानशेत धरणाच्या मागील बाजूस जंगलाचे पुनरूज्जीवन, पाणथळ जागांचा विकास, कुरण विकास असे प्रकल्प राबविले आहेत. मुठा नदीच्या विकासाचा विचार अलीकडील काही वर्षात सुरू झाला; पण संस्थेने वीस वर्षांपूर्वीच मुठा नदीवर रिव्हर फ्रंट प्रकल्प कसा होऊ शकतो, या संशोधनपर अहवाल केला होता.

संस्थेने १९९९ मध्ये सुरू केलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनाचा अभ्यासक्रमाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आत्तापर्यंत संस्थेचे एक हजारांहून अधिक विद्यार्थी निसर्ग संवर्धन क्षेत्रात कार्यरत आहेत.

: शून्यातून विश्व :

# भाजीपाला विक्री ते ५० कोटींचा मालक

अहमदनगर जिल्हा, साखर सम्राटांचा जिल्हा अशी त्याची ओळख. याच जिल्ह्यातलं अकोले गाव. या गावातला नितीन. एका गरिब कुटुंबातील मुलगा. वडील सहकारी खरेदी विक्री संघामध्ये सेल्समन म्हणून नोकरीला. त्यांची महिन्याची मिळकत ४०० रुपये एवढी. या मिळकतीवर पाच जणांच्या कुटुंबाची गुजराण करणं नितीनच्या आईसाठी एक कसरतच होती.



जीवन शिक्षण मंदिर या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या नितीनला मात्र शिक्षणाची आवड होती. नितीन रोजंदारीची, मजूरीची तर कधी भाजी विकण्याची कामं करु लागला. स्वतःचं देखील एक वेगळं विश्व असावं असं त्याला नेहमी वाटे. हे विश्व साकारण्यासाठी पदवी मिळविल्यानंतर त्याने ऑर्के इंडस्ट्रीजच्या उपकंपनीत सुपरवायझरची नोकरी स्विकारली. पण जर मोठ्ठं व्हायचं असेल तर आपल्याला उच्च शिक्षण घ्यावं लागेल या विचाराने नितीनने एमबीए साठी पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला. १९९४-९६ मध्ये त्याला एमबीएची पदवी मिळाली. एमबीएच्या जोरावर त्याला विष्णू प्रिया ॲग्रो इंडस्ट्रीज मध्ये नोकरी मिळाली. ताजी भाजी बाजारपेठेत विकण्याचा व्यवसाय ही कंपनी करत असे. मुंबईमध्ये अजून मॉल संस्कृतीने जन्म घ्यायचा होता त्या काळात या कंपनीने ग्राहकांना स्वच्छ आणि ताजी ब्रॅण्डेड भाजी विकण्याची आयडीया वापरली. शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे नितीनने स्वतःला पूर्णपणे या नोकरीत झोकून दिले. कालांतराने आपण हा व्यवसाय का करु नये या विचाराने नितीनने ही नोकरी सोडली.

शुद्ध, स्वच्छ आणि ताज्या भाज्या विकण्याचा हा व्यवसाय सुरु करण्याचे नितीनने ठरविले. एका परिचिताने त्याला ५ लाखांचं अर्थसहाय्य केलं. पहाटे ३.३० वाजता बाजारातून भाजी आणणे. दुपारी ती व्यवस्थित निवडून, चिरुन ब्रॅण्डेड पिशवीत भरणे आदी कामे तो करत होता. नितीनला नफ्यामधला एक रुपया देखील मिळत नव्हता. ज्यांनी पैसे लावले तेच सगळा नफा लाटत होते. नाईलाजाने नितीनने तो धंदाच बंद केला. ३१ डिसेंबर, १९९९ रोजी नितीन गोडसे यांनी एक्सेल गॅस ॲण्ड इक्विपमेंट्स प्रा. लि ची स्थापना केली. ही कंपनी गॅस पाईप शुद्धीकरणाच्या पूर्ण प्लान्टच्या इन्स्टॉलेशनचं काम करते. आज कंपनीची उलाढाल जवळपास ५० कोटींच्या आसपास असून सुमारे १५० कामगार हे वेतन पटावर आहेत. फायझर, सिप्ला, रिलायन्स, गोदरेज, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्च, कतार पेट्रोलियम आणि भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र हे सगळे या कंपनीचे ग्राहक आहेत. शून्यातून आज एवढी मोठी मजल गोडसेंनी मारली.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# वाघाच्या हल्ल्यात आणखी एका महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. १४ :



५ दिवसांत ६ बळी

वाघाच्या हल्ल्यात आणखी एका महिलेचा बळी गेल्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात घडली.

करबडा येथील जंगलात बुधवारी सकाळी ८ च्या सुमारास ही घटना घडली. कचरा भरडे (६५) असे मृत महिलेचे नाव आहे. ती बुधवारी सकाळी पळसगाव वनपरिक्षेत्रात तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेली होती. यावेळी महिलेसोबत तिचा पतीही होता.

तेंदूपत्ता तोडताना दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक तिच्यावर हल्ला केला. त्यात तिचा जागेवरच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करून चिमूर उपजिल्हा रुग्णालयात मृतदेह रवाना केला.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाघाच्या हल्लूयात मागील ५ दिवसांत ६ महिलांचा बळी गेला आहे. ४ दिवसांपूर्वी अशाच एका घटनेत ३ महिलांचा मृत्यू झाला होता. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही शहरालगत असलेल्या वनविभागाच्या परिक्षेत्रात घडली होती. मृतांत कांता बुधाजी चौधरी (६५), शुभांगी मनोज चौधरी (२८) व रेखा शालिक शेंडे (५०) यांचा समावेश होता. यापैकी कांता चौधरी व शुभांगी चौधरी या सासू व सून होत्या. या तिन्ही महिला मेंढा माल गावातील होत्या.

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करा

■ मुंबई, दि. १४ :

मे महिन्यात राज्यभरात ठिकठिकाणी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने तातडीने शेती नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत दकरावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत केली.

शेतकऱ्यांना काही प्रमाणात नुकसान भरपाई मिळणारी एक रुपयात पीक विमा योजना सरकारने बंद करून शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. पीक विमा योजनेत घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यांनी घोटाळा केला त्यांच्यावर कारवाई करण्याची धमक सरकारमध्ये नसल्याचे ते म्हणाले.

# सराफा व्यावसायिकांवर आयकरच्या धाडी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १४ :

अकोल्यातील चार सराफा दुकानांवर आयकर विभागाने धाड टाकली आहे. ही धाड नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील अधिकाऱ्यांनी टाकली आहे. आज (बुधवारी) सकाळपासून ही कारवाई सुरू होती. अचानक या धाडीच्या बातमीने सध्या अकोला शहरात खळबळ उडाली आहे.

अकोला शहरातील पुनम ज्वेलर्स, प्रकाश ज्वेलर्स, ईशा ज्वेलर्स व एकता ज्वेलर्सच्या संपूर्ण ग्रुपवर धाड टाकण्यात आली. या ज्वेलर्सच्या अमरावती, यवतमाळ, परतवाडा येथील एकूण १७ ठिकाणी छापा कारवाई सुरू होती. आज सकाळपासून आयकर विभागाच्या पथकाकडून तपासणी केली जात आहे. स्थानिक पोलिसांचा बंदोबस्त आहे.

गेल्यावर्षी नांदेड येथे पडलेल्या धाड कारवाईत तपासाचे धागेदोरे अकोल्यापर्यंत आले होते. त्यामुळे अकोल्यातील कोठडी बाजारातील अशोकराज आंगडीया कुरियर सर्व्हिसवर देखील आयकर विभागाने धाड टाकली होती. कुरियरच्या माध्यमातून मोठ्या रकमांचा व्यवहार झाल्याचा संशय होता. मागील वर्षी मे महिन्यातच आयकर विभागाने अकोल्यात धाड टाकली होती. नंतर आज पुन्हा धाड टाकण्यात आली आहे.

# जयअम्बे राईसमिल मधून हजारो क्विंटल धान गायब

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. १४ :

हंगाम २०२४-२५ मध्ये सिएमआर मिलींग प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास येताच जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठीत करून संबंधित राईसमिलची तपासणी केली.

दरम्यान देसाईगंज तालुक्यातील कुरुड येथील जय अम्बे राईसमिलला शासनाने भरडाई करिता दिलेले हजारो क्विंटल धान मिलमधून गायब असल्याचे आढळून आल्याने मिलचे संचालक हरिश जेसा मोटवाणी यांचेवर कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटिल यांनी जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल करून सदर मिलला फक्त तीन वर्षांकरीता काळ्या यादीत टाकण्याची कारवाई केल्याने पुरवठा अधिकाऱ्यांचा महाप्रताप चव्हाट्यावर आला आहे.

तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकारी यांची दिशाभूल करून एकाच प्रकरणातील वेगवेगळ्या राईसमिलवर वेगवेगळी कारवाई केली असल्याने प्रकरणात मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याची दाट शक्यता आहे.

वर्तमान स्थितीत जय अम्बे राईसमिलने शासनाकडून भरडाई करीता घेतलेले तब्बल ५६३१ क्विंटल धान मिलमधुन गायब असल्याचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांच्या चौकशी समितीने दिलेला असतांना मिलमालक हरिश मोटवाणी यांचेवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत कारवाई न करता फक्त तीन वर्षांकरीता काळ्या यादीत टाकण्यामागचे कारण मोठी आर्थिक देवाणघेवाण असल्याचे सांगीतले जात आहे.

हंगाम २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ नाशिकचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सिएमआर मिलींग प्रकरणातील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी समिती नियुक्त केली होती. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार जय अम्बे राईसमिल कुरुड यांनी ६२०३६.९५ क्विंटल धानाची भरडाई केली असून त्यासाठी केवळ १२२० युनिट वीज खर्च केल्याचे नमुद केले आहे. वास्तविक सदर धानाच्या भरडाई करीता ४९ हजार ६२९ युनिट वीज खर्च होणे अपेक्षित होते. मात्र तब्बल ४८ हजार ४१० युनिट वीज कमी खर्च केल्याचे चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात नमूद केले . सदर राईसमिलने शासनाकडून भरडाई करीता घेतलेले धान काळ्या बाजारात विकले व काळ्या बाजारातील मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गुणनियंत्रण अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासन जमा केल्याचे सिद्ध होते.

त्यामुळे सिएमआर मिलींग मध्ये वारंवार गैरव्यवहार करणाऱ्या मिलमालकावर गुन्हा नोंदविणे आवश्यक असतांना फक्त तीन वर्षांकरीता काळ्या यादीत टाकण्याची कारवाई केली.

दरम्यान जय अम्बे राईसमिलचे संचालक हरिश मोटवानी कथित वादग्रस्त काँग्रेस नेता जेसा मोटवानी याचा मुलगा असुन याने सिएमआर मिलींगमध्ये वारंवार अनियमितता केल्याचे समोर येऊ लागले आहे. याच प्रकरणात देसाईगंज व आरमोरी येथील मिलमालकांवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आलेली असतांना मोटवानी याला वाचवण्या ागचे कारण काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एकाच प्रकरणात वेगवेगळ्या कारवाया करण्यात आल्याने व त्यातही देसाईगंज व आरमोरी येथील मिलमालकांवर या आधीच काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली असतांना परत जुन्या प्रकरणाचा संदर्भ घेऊन कारवाई करण्यामागचे कारण काय? तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांची दिशाभूल करून एकाच प्रकरणात वेगवेगळ्या राईसमिलवर वेगवेगळी कारवाई करण्यास का भाग पाडले? याची सखोल चौकशी केल्यास मोठे गौडबंगाल उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. जय अम्बे राईसमिलचे संचालक हरिश मोटवानी याचेवरही कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.